# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १७/०८/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १७/०८/२००६ रोजी सभा सुचना क्र. १२ दि. १०/०८/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ९) | श्री. स्टिवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १३) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| २) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ३) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग, यांचे मी हार्दिक स्वागत करित करतो. ही नवनिर्वाचीत सदस्यांची पहिलीच सभा असल्यामुळे मला त्यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सहकार्य करावे अशी मी त्यांनी विनंती करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगर सचिवांना सुचना करतो.

(नगर सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगर सचिवांनी प्रकरण क्र. ७८ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, पान क्र. ५ वर सन्मा. सदस्य जयंत पाटील यांचे तुम्ही त्या कर्मचाऱ्यांना पाठवून रु. ३०००/- सुरक्षित आहेत का? ते बघा असे वाक्य आहे. ते समजलेले नाही.

**जयंत पाटील :-**

ते वाक्य चुकीचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र.६ वर श्री. खतगांवकर साहेबांचे वाक्य सुध्दा कळलेले नाही.

**जयंत पाटील :-**

आपली प्रोसिडिंग व्यवस्थित लिहिली जात नाही की, चेकींग करताना चुका होतात ते सांगा.

**नगरसचिव :-**

या पॅरेग्राफची वाक्यरचना चुकली आहे. मला ते वाक्य चेक करुन घ्यावे लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब पान क्र. ६ वर तुम्ही असे म्हटलेले आहे की, अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम विभागाचे श्री. राठोड, श्री. भोये आणि श्री. संजय तायशेटे यांच्यावर सन्मा. सदस्यांनी उपस्थित आरोप मांडलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. ह्याच्यापूर्वी मा. आयुक्त साहेबांनी संदर्भ घेउन चर्चा केलेली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी दंड आहे. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली जाईल आणि येणाऱ्या सभेत अहवाल सादर केला जाईल.

**एस. ए. खान :-**

पान क्र.६ वर मी पार्श्वनगर बिल्डींगबाबत एक पत्र दिलेले होते. मला अजुनपर्यंत त्याचे उत्तर दिलेले नाही. पार्श्वनगरमध्ये बिल्डींगचे काम चालू आहे. तिकडे अनधिकृत बांधकाम आहे. श्री. भोये यांना माहिती होते.

**रतन पाटील :-**

पान क्र.१९ वर भाईंदर पश्चिमेला महापालिकेच्या ऑफिसमध्ये शाळा होती. ती शाळा तोडून त्या ठिकाणी मार्केटचे गाळे बनविलेले आहेत. आपल्याला त्या गाळ्याचे भाडे येते का? असे मी मागच्या वेळेला विचारलेले होते. आता त्याबाबत काय परिस्थिती आहे?

**दिपक खांबित :-**

त्याबाबत हाय कोर्टात केस चालू आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.)**

तिथे गाळे आहेत का?

**दिपक खांबित :-**

तिथे गाळे आहेत. आपण त्याच्यासाठी रु. १०००/- भाडे ठरविलेले होते. मागच्या रेटप्रमाणे रु. २००/- भरतात. परंतु, आपण १०००/- ची मागणी केलेली आहे. लाख रुपये डिपॉझीटचा विचार करुन हायकोर्टात गेले आणि ही केस हाय कोर्टात पेन्डीग आहे. ती लोक ग्रामपंचायत काळापासून असलेल्या रेटप्रमाणे भाडे भरतात.

**रतन पाटील :-**

परंतु, ग्रामपंचायतच्या काळामध्ये गाळे बांधून नव्हते दिले? त्यावेळेला रस्त्यावर टपऱ्या होत्या. आजसुध्दा रस्त्यावर टपऱ्या आहेत. महापालिकेची जी शाळा आहे ती शाळा तोडून त्या ठिकाणी काहीतरी शाळा किंवा दवाखाना किंवा कार्यालय होणे आवश्यक होते. परंतु, आपण ती शाळा तोडून त्या ठिकाणी दुकाने बांधलेली आहेत. ती सर्व दुकाने रस्त्यावर होती. तुम्ही ती सर्व दुकाने आतमध्ये घेतली.

**दिपक खांबित :-**

हा निर्णय नगरपालिका असताना घेतलेला होता.

**रतन पाटील :-**

मी त्याच संदर्भात बोलतो की, आपण या लोकांना स्लॅब बांधून दिलेले नाहीत. शिवाय, आपल्या महानगरपालिकेकडे त्याचे उत्पन्न चालू नाही.

**मा. सभापती :-**

परंतु, सदर प्रकरण कोर्टात गेलेले आहे.

**रतन पाटील :-**

उद्या कोणीही कोर्टात जाईल आणि निर्णय मागेल. हे प्रकरण किती वर्षापासून कोर्टात प्रलंबित आहे?

**दिपक खांबित :-**

गाळ्याबाबतचे प्रकरण गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित आहे.

**रतन पाटील :-**

आपले वकी काय करतात? याच्यामुळे महापालिकेचे उत्पन्न कमी होत आहे.

**दिपक खांबित :-**

ही न्यायप्रविष्ठ बाब आहे.

**रतन पाटील :-**

न्यायप्रविष्ठ बाब आहे असे बोलून चालणार नाही. त्याच्यामध्ये प्रशासनाचे अधिकार आहेत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा यांनी म्हटल्याप्रमाणे पूर्वी त्या ठिकाणी ठराविक टपऱ्या होत्या. परंतु, आता जास्त प्रमाणात गाळे बांधलेले आहेत आणि जास्त लोकांनी ऑक्युपाईड केलेले आहे. तुम्ही त्या लोकांकडून जास्त दर भरला पाहिजे किंवा त्या लोकांनी कसे ऑक्युपाईड केले या सर्वांची माहिती घेउन पुढच्या मिटींगला सादर करा.

**दिपक खांबित :-**

त्या लोकांना गाळ्यांवर प्रशासनाने ताबा दिलेला नाही. महानगरपालिका होण्यापूर्वी एक दिवस अगोदर त्या लोकांनी त्या गाळ्यांवर ताबा घेतलेला होता. महापालिकेला गाळे दिले म्हणून त्यांनी ताबा घेतला आणि स्टे घेतला.

**गीता जैन :-**

त्या लोकांनी नगरपालिकेतर्फे स्टे घेतल्याबाबत कोर्टात धाव घेतली. मग आपल्याकडे त्याचा पुरावा आहे का? त्या लोकांनी कुठल्या आधारावर स्टे घेतला ते सांगा.

**रतन पाटील :-**

प्रशासनाने पोलिस बंदोबस्तामध्ये ते गाळे काढायला पाहिजे होते.

**दिपक खांबित :-**

दि. २७ फेब्रुवारी २००२ रोजी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी तिथे जाउन फोटो वगैरे काढले, त्या लोकांना गाळे दिले. ते बोलले की, आम्हाला प्रशासनाने रितसर गाळे दिले म्हणून आम्ही हे केले आणि त्यांना त्या बेसवर स्टे मिळाला.

**गीता जैन :-**

त्यांच्याकडे आपल्या महानगरपालिकेतर्फे काय पुरावा आहे?

**दिपक खांबित :-**

ते आपल्याकड सन १९८४ पासून भाडेकरु आहेत आणि त्यांच्याकडे तेव्हापासूनच्या पावत्या आहेत.

**ग्रिटा फॅरो :-**

याचे पुरावे फक्त चार-पाच लोकांकडेच असतील.

**दिपक खांबित :-**

आपण सद्यस्थिती कोर्टात मांडलेली आहे. त्याच्यामध्ये अजून एक केस होती. आपण ती केस जिंकलेली आहे. श्रीम. द्रौपदी सुर्यवंशी नावाची एक बाई होती. त्या बाईने तिचा गाळा दुसऱ्याला विकला. याच्यामध्ये चार-पाच लोकांचे ओरिजनल गाळे आहेत. बाकीच्या लोकांनी गाळे विकले. एकदा गाळे विकल्यावर पुन्हा विकता येत नाही. सदर केस ठाणे कोर्टात प्रलंबित आहे. परंतु, त्या केसवर निकाल लागलेला नाही. म्हणून त्यांनी हायकोर्टात अपिल केलेले आहे. तसेच जे काही भाडे असेल तुम्ही ते भाडे ठरवून ॲडजेस्ट करायचे अशी हायकोर्टाने आधी ऑर्डर दिलेली होती. आपण त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. जे भाडे असेल ते ठरवून या. लोकांना गाळे द्या असा हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे आणि ती केस यावर्षी निकाली लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही याबाबत डिटेलमध्ये तपासून घ्या आणि संबंधित विषयाचा खुलासा करा.

**गीता जैन :-**

माझ्यामते तुम्ही या विषयाचा सविस्तर अहवाल पुढच्या मिटींगला घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या विधी सल्लागारांनासुध्दा बोलवा.

**रतन पाटील :-**

हा विषय पुढच्या वेळेला घेताना विधी अधिकाऱ्यांनासुध्दा बोलवा.

**दिपक खांबित :-**

ही न्यायप्रविष्ठ बाब आहे म्हणून मी बोलतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पूर्वी गाळे कमी होते. आता जास्त लोकांनी गाळे बांधलेले आहेत. गाळे घेतलेले कोणते लोक आहेत? ते कोण भाडेकरु होते?

**रतन पाटील :-**

ती लोक भाडेकरु नाहीत. रस्त्यावर बसणाऱ्या फेरिवाल्यांना महापालिकेच्या हद्दीमध्ये आणायचे आपले राईट्स आहेत.

**दिपक खांबित :-**

आपल्या ऑफिससमोर झुणका भाकर केंद्रवाला बसतो. श्री. आर.डी. शिंदे साहेब असताना आपण त्यांना जागा दिलेली होती. आणि त्यांनी त्या जागेवर टपऱ्या बांधलेल्या आहेत. असे ते भाडेकरु आहेत.

**जयंत पाटील :-**

त्या लोकांनी काहीतरी पुरावा दिल्याशिवाय कोर्टात जाउ शकतात का?

**दिपक खांबित :-**

आपण त्यांना पावत्या दिलेल्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये भुईभाड्याचासुध्दा उल्लेख होउ द्या.

**जयंत पाटील :-**

आता कोर्टात किती लोक गेलेली आहेत? आणि आता तिकडे किती लोक आहेत? ते सांगा.

**रतन पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे भाडे येते त्याच्यावर दोन गाळ्यांवर भाडे लावायला पाहिजे होते. ऑफिशियली केले नाही तर त्याच्याकडून करायला पाहिजे होते.

**शशिकांत भोईर :-**

भुईभाडे घ्यायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

अग्रवाल सेवा समितीची लोक सामान ठेवतात. त्यामुळे आपण फक्त त्यांना तिथे सामान ठेवण्यासाठी दिलेले आहे. बाकी कोणालाही दिलेले नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, ह्याच्यामध्ये पालिकेचे नुकसान होत आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्याचा फॉलो-अप कोण करतो? महापालिका खरोखर फॉलो-अप करते का? महापालिकेच्या हिताच्यादृष्टीने निकाली निघावे. जेणेकरुन महापालिकेचा फायदा होईल. बांधकाम खाते फॉलो-अप करते का?

**दिपक खांबित :-**

मी तुम्हाला संबंधित नोट देतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही कोणाला जबाबदारी दिलेली आहे?

**दिपक खांबित :-**

ते काम मीच घेतलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही याबाबत चर्चा करण्यासाठी विधी अधिका-यांना बोलवा.

**शशिकांत भोईर :-**

दुसरा विषय असा आहे की, आपण पंचिंग कार्डची सिस्टिम चालू करण्णार होतो. त्याची प्रोसिजर कुठंपर्यंत आलेली आहे ते सांगा.

**रतन पाटील :-**

आपला पंचिंग मशिनबाबत ठराव झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

पंचिंग कार्डचे टेन्डर आलेल आहे. आपण ते टेन्डर येणा-या सभेमध्ये मंजुरीसाठी सादर करुया.

**शशिकांत भोईर :-**

त्या पंचिंग मशिमध्ये फक्त कार्डचीच सोय न करता थम्ब इम्प्रेशनचीसुध्दा सोय केली जावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

पंचिंग कार्ड आणि थम्ब इम्प्रेशन दोन्ही ठेवूया.

**रोहिदास पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, मी तुम्हाला आधीच पत्र दिलेले आहे. आपल्याकडे कोणत्या डिपार्टमेन्टमधील फाईल कोण उचलून नेतो हे माहित पडत नाही. एखादा कर्मचारी स्थायी किंवा अस्थायी आहे हे समजत नाही. आपण मंत्रालयात किंवा सचिवालयात गेलो तर सचिवांच्या गळ्यात कार्ड असते.

**रतन पाटील :-**

महापालिकेने आयकार्ड देणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे प्रोसिडिंग भारी होते. त्याच्यामध्ये सर्व काही आलेले होते. ही लोक ते बोलले आणि विसरुन गेले. परंतु, त्याच्यापुढे काय? तुम्हाला ह्याच्यामध्ये काही अडचण असण्याचे काहीही कारण नाही. तुम्ही स्मार्टकार्डची पध्दत ठेवा. जर कर्मचा-यांच्या गळ्यात स्मार्टकार्ड असेल तर ह्या डिपार्टमेन्टची ही लोक आहेत हे माहिती पडेल.

**मा. सभापती :-**

कार्ड असणे आवश्यक आहे. त्यामुळे तो कर्मचारी कुठल्या डिपार्टमेन्टचा आहे ते माहिती पडेल.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामुळे कोण कर्मचारी कुठला आहे ते माहिती पडते. जर तो ठेकेदाराचा कर्मचारी असेल तरी माहिती पडेल. कर्मचारी असेल तर ते माहिती पडेल. एखादा व्हिजीटर आला तर तो मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ह्या-ह्या डिपार्टमेन्टच्या अधिका-याबाबत सांगु शकेल.

**रतन पाटील :-**

कर्मचारी इथे हजेरी लावतात आणि निघून जातात.

**मा. सभापती :-**

कर्मचा-यांकडे स्मार्टकार्ड असणे आवश्यक आहे आणि कर्मचा-यांना स्मार्टकार्ड देणे ही चांगली गोष्ट आहे. कारण परवा एका इन्स्पेक्टरला गाडीच्या ड्रायव्हरने मारले आणि ती गाडी पोलिस स्टेशनला घेउन गेले. नंतर समजले की, पोलिसाला मारलेले आहे. तेव्हा तो माणूस पोलिस असल्याचा पुरावा आहे का? असा प्रश्न

विचारला त्या इन्स्पेक्टरकडे आयकार्ड नसेल म्हणून त्याला मारले असेल नाही तर पोलिसांना मारले नसते. उद्या पुन्हा अशीच परिस्थिती येईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांजवळ आयकार्ड असणे आवश्यक आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या सुचनेशी मी सहमत आहे. आम्ही बेंगलोरला दौऱ्याला गेलो तेव्हा तिथे सफाई कामगारांपासून प्रत्येकाच्या गळ्यात आयकार्ड होते आपण स्मार्टकार्ड बोलतो त्याप्रमाणे साधे कार्ड प्रत्येकाच्या खिशात नाही तर गळ्यात लटकवलेले होते.

**रोहिदास पाटील :-**

चंदीगडला सिटी इंजिनियरच्यासुध्दा गळ्यात कार्ड होते.

**जयंत पाटील :-**

कर्मचाऱ्यांनाकडे आयकार्ड असणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण शिपायांना युनिफार्म देण्यासाठी एवढे पैसे खर्च करतो. परंतु, शिपाई युनिफॉर्म घालत नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

शिपायांना युनिफॉर्म घालायला लाज वाटते का? सिव्हील ड्रेसमध्ये राहिले तर काय हिरो दिसतात? जर त्यांना सिव्हील ड्रेस पाहिजे असतील तर आपण त्यांना सिव्हील युनिफॉर्म शिवून देऊया.

**रोहिदास पाटील :-**

आपण हे सभागृह तीन तास चालवायचे असेल तर तीन तास चालवूया. परंतु, ह्याच्यामध्ये काही विषय महत्वाचे आहेत. सेक्युरिटीचासुध्दा एक विषय आलेला आहे. आपल्या महापालिकेन कुठेतरी काऊंट करायला पाहिजे की, आपल्या शहरातील किंवा आपल्या राज्यातील किंवा आपल्या महानगरातील जनतेचे भले करायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण काहीतरी बंधन ठेवले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आता आपले महागनर हिट लिस्टवर आहे. नको ते विषय चालतात असे घेऊ नका. परंतु, मिरा भाईंदर कशात जोडलेले आहे. त्याच्यामध्ये आपली व्यवस्था पाहिजे.

**जयंत पाटील :-**

आपल्याच शहरामध्ये, बॉम्बस्फोट करणारी लोक राहतात.

**शशिकांत भोईर :-**

हा महत्वाचा मुद्दा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी त्याच बातमीबाबत बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

या बॉम्बस्फोटातील लोकांमध्ये नयानगरचे नाव होते. हे मी खास करुन सन्मा. सदस्य एस. ए. खान यांना सांगु इच्छितो.

**रतन पाटील :-**

आपण महापालिकेच्या प्रथम प्रवेशद्वारावर चेकींगची व्यवस्था ठेवली तर उत्तम होईल. आपल्या महापालिकेचे दोन दरवाजे उघडेच असतात.

**जयंत पाटील :-**

बॉम्बस्फोट करणारी लोक नयानगरमध्ये पकडली.

**एस. ए. खान :-**

हे बॉम्बस्फोट करणारे लोक कोण आहेत हे माहिती पडत नाही.

**जयंत पाटील :-**

बॉम्बस्फोट करणारे कोण आहेत? ते माहिती पडत नाही हाच महत्वाचा मुद्दा आहे.

**मा. सभापती :-**

भाईंदरला भाड्याने फ्लॅट मिळतात. म्हणून नक्षलवादी वगैरे इकडे रहायला येतात.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, जे अॅग्रीमेंट असेल ते पोलिस स्टेशनला रजिस्टर करायचे असे आता नवीन सत्र सुरु केलेले आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

भाईंदरला रूम भाड्याने मिळतात ते बरोबर आहे.

**एस. ए. खान :-**

भाईंदरला स्वस्तात फ्लॅट मिळतात.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या भाडेकरूंना सुरक्षा आणि ज्या अत्यावश्यक बाबी आहेत त्या लागू करु नयेत.

**जयंत पाटील :-**

आतंकवाद्यांना पैशाची कमी नाही. त्यांना इतर ठिकाणाहून भरपूर पैसा मिळतो. त्या लोकांची मिरा रोडला एक विशिष्ट वस्ती आहे. ती लोक स्वस्तात फ्लॅट मिळतात. म्हणून इकडे येत नाहीत.

**फॅरो ग्रिटा :-**

त्यांना सर्व काही पुरविले जाते.

**जयंत पाटील :-**

त्याच्यामुळे आमचे जे मुस्लिम बांधव आहेत ते उगीचच बदनाम होतात.

**रतन पाटील :-**

आतंकवादी अतिरेकी कारवाया करतात आणि मिरारोडचे मुस्लिम लोक बदनाम होतात.

**मा. सभापती :-**

या शहरामध्ये खरोखर अशी एक परिस्थिती निर्माण झालेली आहे की, आपण प्रत्येक माणसाला ओळखू शकत नाही. आपल्याकडे त्याचा काहीतरी पुरावा पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे बांगलादेशी सुद्धा आहेत.

**रोहिदास पाटील :-**

ज्याप्रमाणे ११ तारखेला रेल्वे स्टेशनवर बॉम्बस्फोट झाला त्याचा गांभीर्याने विचार केला तर नंतर अतिरेक्यांच्या हालचाली लक्षात आल्या. मिरा भाईंदर महापालिकेच्या साडेसात लाख लोकांच्या भवितव्याच्या दृष्टीने किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेने अशी अशी उपाययोजना केलेली आहे अशी तुमच्याकडे तशी टिपणी असणे आवश्यक आहे. मग तुम्ही उत्तर देऊ शकाल. आम्ही सोळा नगरसेवक तुम्हाला काहीही विचारु. तुम्हाला जर काही बोलायचे असेल किंवा तुम्हाला कोणीतरी सुज्ञ नागरिक विचारेल किंवा कोणीतरी अधिकारी विचारेल तर तुम्हाला उत्तर देता आले पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपले कर्मचारी वेळेवर कामाला येतात का? खरोखर कर्मचारी कामावर येतात का? हे कर्मचारी दिवसभर आलेले आहेत का? ह्याच्यावर देखरेख करण्यासाठी एक अधिकारी नेमा.

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेत नगरसेवकांच्या गाड्या बाहेर लागतात. जर एखादा आतंकवादी आला आणि इथे गाडी ठेवून गेला तर आपण काय करणार? आपली सेक्युरिटी काय करणार? कारण नगरसेवकांच्या गाड्या बाहेर असतात.

**रोहिदास पाटील :-**

आपण संशयाने बघायचे कारण नाही. परंतु, आपण आपल्यापरीने दखल घेतली तर बरे होईल.

**एस. ए. खान :-**

एक-दोन इन्स्ट्रुमेन्ट ठेवल्या तरी बरे होईल.

**रतन पाटील :-**

आपण पालिकेत गाड्या पार्क करण्यासाठी कसलीही सुरक्षितता ठेवलेली नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, नगरसेवक कधीही येऊ शकतात. परंतु, बाहेरच्या माणसाने कधी यायचे? आपण त्याची वेळ ठरवून दिलेली होती. तुम्हीच ती वेळ मोडळी. नागरिकांनी पालिकेमध्ये कधी यायचे आपण यासंबंधीचे बाहेर बोर्ड लावलेले होते.

**रतन पाटील :-**

आम्ही ती वेळ कशी मोडली?

**रोहिदास पाटील :-**

आता दुसरा असा विषय आहे की, आपल्या नागरिकांच्या हिताच्या दृुष्टीने आपली एकमेव पाईपलाईन आहे. आपण पाणीपुरवठ्याच्यादृष्टीने काय केले? याकडे लक्ष द्यायला पाहिजे. एक पाईपलाईन उडवली किंवा चार दिवस रिपेअर झाली नाही तर साडे-सात लाख लोकांना कोण पाणी देणार आहे? तुमची पाण्याची संपूर्ण व्यवस्था राहिल आणि साशंकता निर्माण होईल असे नाही. आम्ही पातलीपाडा किंवा चेण्याला महापालिकेच्यावतीने आमच्या लोकांमार्फत काहीतरी व्यवस्था करु शकतो.

**रतन पाटील :-**

उद्या मिरारोडसारख्या ठिकाणी आतंकवादी, सिमी, लष्कर ए तोयबासारखे कोणीही येऊ शकतात. त्यांना महापालिका उडवायला वेळ लागणार नाही. इथे चेकींग करायला कोणीही नसल्यामुळे हे आतंकवादी दोन मिनीटामध्ये महापालिका वगैरे उडवून जाऊ शकतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.)**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मिरा भाईंदर शहरामध्ये जो काही बॉम्बस्फोट झालेला होता. त्याबाबत सन्मा. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांचे गांभीर्य लक्षात घेउन शहराच्या हद्दीमध्ये ज्याकाही महापालिकेच्या सेवा आहेत किंवा पाणीपुरवठा वगैरेसारख्या ज्या सेवा आहेत किंवा ज्या काही इतर मालमत्ता आहेत त्याच्या संरक्षणाच्या अनुषांगाने आवश्यक तो कृती आराखडा तयार करुन येणाऱ्या सभेत सादर करु. आम्ही मुख्य कार्यालयात मेटल डिटेक्टर ठेवण्याच्या अनुषंगाने फाईल प्रस्तावित केलेली आहे. त्यासंबंधी मा. आयुक्त आणि त्यासंबंधिच्या अधिकाऱ्यांची मंजुरी घेउन कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. वास्तविक आम्ही हे काम बॉम्बस्फोट घडण्यापूर्वीच करण्याचे सुरु केलेले होते. परंतु, आता बॉम्बस्फोट घडल्यामुळे हे काम गांभीर्याने घेण्याचे ठरविलेले आहे. याशिवाय, आपल्या ज्या इतर मालमत्ता आहेत. आम्ही त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेबांकडे कृती आराखडा तयार करुन आपल्यासमोर सादर करु.

**रोहिदास पाटील :-**

याबाबत मी असे विचारु इच्छितो की, ही घटना घडल्यावर तुमची पोलिसांबरोबर खाजगी बैठक झालेली होती का? आम्हाला बाकीचे काहीही विचारायचे नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.)**

शहर पातळीवर सर्व नागरिकांचे संरक्षण करणे ही बाब महापालिकेच्या अखत्यारितील बाब नसून राज्यशासकीय अखत्यरित बाब आहे. त्या अनुषंगाने शांतता समितीच्या बैठका झालेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला मुद्याचे सांगतो की आम्हाला हे अपेक्षित आणि अभिप्रेत असल्याचे वाटते. महापालिकेचे आयुक्त आणि इकडचे एस. पी. यांनी या शहरातील हालचालीच्या दृष्टीने कॉन्फीडिन्शीयल बैठका होणे आवश्यक आहे. जे आम्हाला माहिती नाही. परंतु, तुम्हाला माहिती आहे. तुमच्या अशाप्रकारच्या व्यवस्था होण आवश्यक आहे. तुम्ही गणपती उत्सवाच्या दिवशी एकत्र बसुन बैठका घेणे किंवा खानापुर्ती करणे हा एक वेगळा विषय आहे. आजची सभा चिंता व्यक्त करते असे तुमच्या ज्या कोणी अधिकाऱ्यांना लिहावेसे वाटत असेल त्यांनी तसे लिहावे. कारण इथे रु. २ कोटीचे हेरॉईन मिळते, हे आरोपी मिळतात ते आरोपी मिळतात. मी सगळ्यांची यादी सांगत नाही. परंतु, तुम्ही दोघांनी शहरातील सुरक्षिततेच्यादृष्टीने काय ठरविलेले आहे? ते समजणे आवश्यक आहे. जर आवश्यकता नसेल तर स्पष्ट करा आणि जर आवश्यकता नसेल तर स्पष्ट करण्याचे काहीही कारण नाही. आम्हाला काहीही सांगायचे कारण नाही. परंतु, आम्ही सक्षम आहोत आणि आम्ही दखल घेतलेली आहे असे तुमचे उत्तर यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

साहेब, महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत. उदाहरणार्थः- आपली ही जी इमारत आहे किंवा त्या पाण्याच्या टाक्या आहेत. ह्या सगळ्याच्या देखरेखीबाबत पोलिस डिपार्टमेंट कुठपर्यंत सक्षम आहे ते सांगा.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मी ते मान्य केलेले आहे. परंतु, आपल्या ज्या काही मालमत्ता आहेत. मी त्याबाबत निवेदन केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

मी ते कृती आराखडा तुमच्यासमोर सादर केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

जर तुम्हाला या बाबतीत पोलिसांची मदत हवी असेल तर पोलिसांची मदत घ्या.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आम्ही या ठिकाणी याबाबतीत मुद्दा मांडलेला आहे. संपूर्ण शहराचे जे गांभीर्य आहे ते लक्षात घ्यायला पाहिजे . शहराचे संरक्षण नागरिकांनी अंतर्गत व्हायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

तो एक वेगळा भाग आहे. तो भाग लहान ऑर्डरच्या अंडर येतो.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

हा एक मोठा विषय आहे. त्यासाठी राज्यशासन सक्षम आहे आणि त्या अनुषंगाने राज्यशासन कारवाही करीत आहे. आपण त्याबाबत या ठिकाणी विवेचन करणे आपल्या स्तरावर शक्य नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मानिय . सदस्य रतन पाटील यांनी गाडयांच्या बाबतीतील मुद्दा उपस्थित केला. मी त्याबाबत असे सांगू इच्छितो की तुम्ही नगरसेवकांच्या गाड्यांना सिम्बॉल द्या जेणेकरुन, आमच्या गाडीचे चेकिंग होणार नाही. आम्ही आमच्या गाडीला स्टिकर लावून टाकू. स्टिकर कुठले द्यायचे? ते तुम्ही ठरवायचे आहे.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आम्ही इमिजिएट स्टिकर बनविलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

आपले वॉचमेन गाड्यांना ओळखतात. म्हणून तुम्ही आम्हाला गाड्यांना स्टिकर द्या. जेणेकरुन, आमची गाडी चेक केली जाते या विचाराने नगरसेवकांना अपमानकारक वाटायला नको.

**फॅरो ग्रिटा :-**

त्यासाठी गाड्यांचे नंबरसुद्धा द्यावे लागतील का?

**जयंत पाटील :-**

गाड्यांचे नंबरसुद्धा देणे आवश्यक आहे. त्या पद्धतीने एक स्टिकर बनवून घ्या.

**मा. उपायुक्त (मु.) सो. :-**

आपल्या वाहनाच्या मालमत्ता किंवा वाहन पार्किंगसाठी अशा स्टिकरची आवश्यकता आहे.

**जयंत पाटील :-**

इतर गाड्यांच्या पार्किंगला हे सोयीस्कर पडेल.

**परशुराम म्हात्रे :-**

पान क्र. २४ वर मिरारोड नवीन सृष्टी (७४) असे पाहिजे. मिरारोड असे एस.टी.डी. ते सृष्टी पोलिस चौकी रस्ता दुरुस्त करणे असे पाहिजे. पुन्हा त्याच्यामध्येच सृष्टी पोलिस चौकी ते पुनम सागरकडे जाणारा रस्ता असे पाहिजे. या ठिकाणी जवळजवळ रु. १५ लाखाचा निधी वापरलेला आहे. आता दोन महिन्यापूर्वी रोड झालेला आहे आणि त्या रोडमध्ये कुठलाही खड्डा नाही. त्या रोडबाबत कुठल्याही नगरसेवकाने पत्रव्यवहार केलेला नाही. ते उलटसुलट झालेले आहे. शगुन हॉटेल ते सृष्टी रस्त्याच्या दुरुस्तीकरणाबाबतचा विषय आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

ते काम तुमच्याच वॉर्डमधील आहे का?

**परशुराम म्हात्रे :-**

ते काम माझ्याच वॉर्डमधील आहे. साहेब, ज्या ठिकाणी निधीची आवश्यकता आहे त्या ठिकाणी हा निधी दिलेला नाही.

**दिपक खंबित :-**

तुम्ही कुठली कुठली कामे दिलेली आहेत ते सांगा.

**परशुराम म्हात्रे :-**

मी सृष्टी नविन पोलिस चौकीबाबत सांगितलेले आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु, त्या ठिकाणी नविन रस्ता नाही. सृष्टीपासून पेणकरपाड्याचा जो रस्ता आहे. तिथुन मिरारोडकडून शांतीनगरला जो रस्ता जातो त्याच्या दोन्ही बाजुची कामे राहिलेली आहेत. नं.८० चे शगुन हॉटेलपासुन सृष्टीपर्यंतचे काम आहे. आता त्या ठिकाणी गटाराचे काम चालू आहे मी त्या रस्त्याबाबत बोलत आहे.

**परशुराम म्हात्रे :-**

परंतु, सृष्टी ते पुनम सागरपर्यंतचा रोड आताच नवीन झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

तो रोड नवीन झालेला आहे.

**परशुराम म्हात्रे :-**

साहेब, त्या रोडवर एकही खड्डा पडलेला नाही. या रोडबाबत कुठल्या नगरसेवकाने पत्र दिलेले आहे? ते सांगा.

**दिपक खांबित :-**

त्या रोडवर खड्डा पडण्याचा प्रश्न येत नाही. तो रस्ता खोडलेला आहे. जर तुम्हाला तो रस्ता बघायचा असेल तर तुम्ही आजसुध्दा माझ्याबरोबर येऊ शकता.

**परशुराम म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही त्या रस्त्याला गरज नसताना निधी का वापरता?

**दिपक खांबित :-**

आपण गरज नसेल तर निधी वापरायचा नाही. परंतु, त्या रस्त्याला निधीची गरज आहे.

**परशुराम म्हात्रे :-**

परंतु, त्या रस्त्याबाबत कुठल्या नगरसेवकाने पत्र दिलेले आहे? ते सांगा आणि ते पत्र दाखवा.

**दिपक खांबित :-**

या ठिकाणी नगरसेवकाच्या पत्राचा संबंध येत नाही. आम्हाला जे काम दिलेले आहे आम्ही ते काम करणार आहोत.

**परशुराम म्हात्रे :-**

आम्ही जेव्हा पत्र टाकतो, तेव्हा तुम्ही पत्राची अंमजबजावणी करणे आवश्यक आहे. आता पांडूरंग वाडीचे शौचालय मोडकळीस आलेले आहे. तुम्ही तिथे निधी वापरत नाही. आम्हाला निधी वापरायला सांगितले तर तुम्ही फंड संपला असल्याचे सांगितले.

**दिपक खांबित :-**

तुम्ही जर असा आरोप करता, काम नसताना काम काढलेले आहे. त्यामुळे आपण त्या ठिकाणी जाऊन बघूया.

**परशुराम म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही तीन ठिकाणची कामे अशीच फिरवलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

एखादे काम करण्याबद्दल आमचा नकार नाही. तुम्ही एखादे काम प्रस्तावित केलेले असेल आणि ते काम झालेले नाही हे सत्य आहे. परंतु, त्यांनी जे काम प्रस्तावित केलेले आहे ते काम अनावश्यक आहे असे तुमचे म्हणणे आहे का?

**परशुराम म्हात्रे :-**

होय.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

सन्मा. सदस्य परशुराम म्हात्रे यांचे असे म्हणणे आहे की, एखाद्या रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात झाली आणि ती दुरुस्ती वेळेवर केली नाही तर तो रस्ता खराब होतो. म्हणून ते काम प्रस्तावित केलेले आहे.

**परशुराम म्हात्रे :-**

साहेब, पांडूरंगवाडीचे शौचालय एकदम मोडकळीस आलेले आहे. वाटल्यास तुम्ही त्या शौचालयाबाबत श्री. अजित पाटील यांना विचारा.

**दिपक खांबित :-**

आम्ही ते शौचालय बघून घेऊ

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

आम्ही त्या शौचालयाबाबत बघून घेतो.

**जयंत पाटील :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे जे ७४ नंबर आणि ७६ नंबरचे काम आहे. त्या दोन्ही कामांमध्ये एक रुपया कमी जास्त नाही. दोन्ही कामांचा खर्च रु. ४ लाख ९९ हजार २५०/- इतका आहे. ठेकेदारसुध्दा तोच आहे. दोन्ही कामांची रक्कम तीच आहे. तुम्ही या कामांसाठी थोडासा तरी अमाऊंट वाढवून द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

त्याच्यासाठी इस्टीमेटचे प्लॅन असतात.

**जयंत पाटील :-**

कॉन्ट्रॅक्टरसुध्दा तोच आहे. हा त्याच्यामध्ये महत्वाचा भाग आहे. तुम्ही एकच काम डबल केलेले आहे असा त्याचा अर्थ होतो. साहेब, मुळात ही कामे घेणाऱ्या ज्या मजुर संस्था आहेत, या संस्था ती कामे करित नाहीत. हे सगळे ओपन आहे. म्हणजे याच्यामध्ये काहीही लपून राहिलेले नाही. ह्याबाबत श्री. दिपक खांबित यांना सर्व काही माहिती आहे आणि मी याची संपूर्ण माहिती काढलेली आहे. याचे काही नॉम्स आहेत. त्या संस्थांनी स्वतः काम करायला पाहिजे या संस्था सक्षम होण्यासाठी शासनाने आदेश काढलेले आहेत. या खेड्यातील संस्था म्हणजेच शहापुर, मुरबाड, वाडा, कल्याण ह्या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी शासनाने आदेश काढलेले आहेत. परंतु, ही लोक त्या आदेशाची अंमलबजावणी करत नाहीत. आमचे टेन्डर भाईंदरमध्ये पास झालेले आहे असे या कमिट्यांच्या सदस्यांना माहिती नसते. कोणीतरी चेअरमन पैसे घेतो आणि आपले कॉन्ट्रॅक्टर कामे करतात. परंतु, कामाचा दर्जा बराबर नसतो. तेच काम सहा-सहा महिन्यानंतर करावे लागते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.)**

सोसायटीच्या आम सभा होत असतात. त्याच्यामध्ये किती कामे घेतली? वगैरे बाबतचा रिपोर्ट द्यावा लागतो.

**जयंत पाटील :-**

माझ्याकडे आमसभेची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. तसेच, माझ्याकडे शासनाचे आदेशसुध्दा आहेत. त्या ठेकेदाराने तिकडचे कामगार आणून कामे करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आतापर्यंत कुठल्याही सोसायटीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकलेले नाही. एवढा पैशाचा दुरुपयोग होउनसुध्दा तुम्ही वस्तुस्थिती नाकारु शकत नाही. यांनी सांगितलेली कामे अतिशय निकृष्ठ दर्जाची आहेत. परंतु, या सोसायटीचे अत्यंत निकृष्ठ दर्जाचे काम केलेले आहे म्हणून आपण त्या सोसायटीला काम द्यायचे नाही असे

आपण कधीही ऐकलेले नाही किंवा तुम्ही तसे निवेदनसुध्दा केलेले नाही. ठेकेदाराचे कामगार व्यवस्थित काम करित नाहीत.

**मा. सभापती सो.**

इथले कामगारसुध्दा व्यवस्थित काम करित नाहीत. घोडबंदरला रस्त्याचे काम न केल्यामुळे रस्ता खराब झालेला आहे. त्याच रस्त्याने मा. महापौर आणि मा. उपमहापौरसुध्दा जातात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.)**

आपण त्या रस्त्याची पाहणी सुरु केलेली आहे.

**मा. सभापती सो.**

त्या रस्त्याच्या साईडने गटार खोदायला पाहिजे होते. परंतु, त्या रस्त्याला गटार न खोदल्यामुळे तो रस्ता दोन महिन्यात खराब झालेला आहे. त्यामुळे सर्व पैसा पाण्यात गेलेला आहे.

**जयंत पाटील :-**

माझ्या प्रभागात कुणाल कुटीर ते दत्त मंदिरापर्यंत गटारावर स्लॅब टाकलेले आहेत. त्याचे तीन वेगवेगळे आकार आहेत. ताजमहल बनविला तर त्या कामगारांची बोटे कापली. या लोकांनी इतके चांगले गटार पुन्हा बनवू नये म्हणून यांचे हात कापायला पाहिजेत. एक गटार सरळ बनविले आहे, एका गटाराला वलय दिलेले आहे, एका गटाराला त्रिकोण दिलेला आहे. याचे कारण असे आहे की, आपले अधिकारी साईटवर जात नाहीत. हे अधिकारी फक्त ऑफिसला बसूनच तिकडचे काम कागदोपत्री ठरवतात. आता श्री. दिपक खांबित यांना प्रश्न विचारला तर त्यांनी चुकीचे उत्तर दिलेले नाही. तो हुषार माणूस आहे असे मी म्हणेन. श्री दिपक खांबितच्या म्हणण्याप्रमाणे हा रस्ता तो नाही. तो रस्ता तो आहे हे उत्तर बरोबर आहे. आमची फक्त तुमच्याकडून एवढीच अपेक्षा आहे की, या शहरातील कामे चांगल्याप्रकारे व्हायला पाहिजेत. आपण हे सगळे लोकांच्या पैशाने करित आहोत. टॅक्सधारकांचेसुध्दा पैसे आहेत. मग आपल्याला कामामध्ये चांगली क्वालिटी का मिळत नाही? तुम्ही आम्हाला कामामध्ये चांगली क्वालिटी द्या. मग काम कोणी करायचे? ते आम्ही बघू.

**परशुराम म्हात्रे :-**

परंतु, त्या रस्त्यासाठी निधी वापरण्याची गरज नाही.

**परशुराम म्हात्रे :-**

आपण सृष्टी पोलिस चौकी आणि पुनमसागरला जो रस्ता बनविला त्याला दोन-तीन महिने झाले. त्या रस्त्यालासुद्धा दुरूस्तीसाठी खर्च झालेला आहे. शिवाय, तो नवीन रस्ता बनविलेला आहे.

**दिपक खांबीत :-**

ही चुकीची माहिती दिलेली आहे.

**मा. सभापती सो. :-**

तो संपूर्ण रस्ता खराब झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही तुमच्या ज्युनियर इंजिनियरला रस्त्याची पाहणी करायला पाठवा.

**दिपक खांबीत :-**

साहेब, तो रस्ता सन २००३ मध्ये बनविलेला होता.

**परशुराम म्हात्रे :-**

तो सन २००२ ला बनविला असला तरी तो रस्ता आता व्यवस्थित आहे.

**दिपक खांबीत :-**

तुम्ही याच्यावर कमिटी नेमा असे माझे म्हणणे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ज्युनियर इंजिनियरना यांच्याबरोबर पाठवा आणि सर्व्हे करा. तुम्ही तो रिपोर्ट पुढच्या मिटींगला सादर करा.

**परशुराम म्हात्रे :-**

आता निधी वापरण्याची गरज नाही.

**फॅरो ग्रिटा :-**

जर स्थानिक नगरसेवक असतील तर पाठवा. उगाचच वाद नको.

**दिपक खांबीत :-**

स्थानिक नगरसेवकांना पाठवा.

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

टेम्पो असल्यामुळे त्रास होतो.

**रोहिदास पाटील :-**

जैसल पार्कला एक गटार बनवायचे होते. ते गटार पाच-सहा वर्षांनी सुरू केले. मी सार्वजनिक बांधकाम विभागाला अभिनंदन करतो. कारण इतक्या अडचणी आल्या, इतके पुढारी आले तरी त्या गटाराचे काम पूर्ण झालेले आहे. त्या ठेकेदाराचे एवढे-एवढे नुकसान झालेले आहे. तरीसुद्धा त्या ठेकेदाराने ते काम पूर्ण केले आहे. याबाबत श्री. दिपक खांबीत आणि श्री. मुकणे यांनी ते काम पूर्ण केलेले आहे. ते काम होत की नाही ही काळजी एक चांगले काम केलेले आहे. फेरिवाल्यांना कोणीतरी त्याच्यावर ॲक्शन घ्यायला पाहिजे. परंतु, तुम्ही कुठलीही ॲक्शन घेणार नाही.

**मा. सभापती :-**

फेरिवाल्यांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला तुमचे अधिकार वापरायला पाहिजेत.

**शशिकांत भोईर :-**

आपण फेरिवाल्यांबाबतचा ठराव केलेला होता. आपण त्या ठरावामध्ये 'ना फेरिवाला झोन' मध्ये बसायला द्यायचे नाही असे ठरविलेले होते. आपण मुख्य रस्त्यावर जे फुटपाथ केलेले आहे. ते फेरिवाले त्या फुटपाथवर बसतात त्यामुळे लोकांना यायला-जायला जागा मिळत नाही. लोकांना यायला-जायला भारी पडते. लोक रस्त्यावरून न चालता फुटपाथवरून चालतील यासाठी आपण फुटपाथ केलेले होते. त्यामुळे आपण फुटपाथ म्हणून नाव दिलेले आहे बिल्डिंगचे नाव दिलेले नाही. ती बिल्डिंगची जागा आहे. पावसाळ्यात गाड्यांची भरपुर वर्दळ असते. त्यामुळे लोकांचे कपडेसुद्धा खराब होतात.

**मा. सभापती :-**

प्रत्येक वेळेला बाजाराचा विषय येतो. परंतु, आपण एकदा बाजार उठवला तर पुन्हा लगेच भैये बसतात. त्यामुळे जागा होत नाही. तुम्ही पंधरा वर्षाचा निकष लावून ठराव घेउन या. ज्यांचे पंधरा वर्षाचे लायसन्स असेल अशा फेरिवाल्यांना बसवण्याबाबतचा विषय पुढच्या मिटींगला घेउन या.

**रोहिदास पाटील :-**

एक चित्र असं आहे की मुंबई महापालिका हद्दीमध्ये किती फेरिवाल्यांनी बसावे ती संख्या आपल्याकडे आली आणि रामराज्याप्रमाणे सगळी मोकळीक मिळाली.

**रतन पाटील :-**

आपण 'ना फेरिवाला क्षेत्र' मध्ये पंधरा वर्षाचा निकष लावू शकत नाही. 'ना फेरिवाला क्षेत्र' म्हणजे 'ना फेरिवाला क्षेत्र' आहे. तिथे 'फेरिवाला क्षेत्र' असा निकष लावू शकत नाही. तिथे फेरिवाले बसू शकत नाहीत.

**मा. सभापती :-**

मी 'ना फेरिवाला क्षेत्र' बाबत बोलत नाही. परंतु, बाकीचे जे काही क्षेत्र आहे. मी त्याबाबत बोलत आहे. आपण फेरिवाल्यांना कुठेतरी बंधन घातले पाहिजे. नाहीतर हे फेरिवाले वाढत जातील.

**रतन पाटील :-**

महापालिकेचा 'ना फेरिवाला क्षेत्र' वर कंट्रोल नाही.

**मा. सभापती साो. :-**

जर आपण फेरिवाल्यांना पंधरा वर्षाचा निकष लावला तर ते ऑटोमेटीक बसायचे बंद होतील.

**रोहिदास पाटील :-**

बंदरवाडीच्या प्रभाग ऑफीसच्यासमोर सगळे फेरिवाले बसतात आणि आपला तिथेच बस स्टॉप आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही फेरिवाल्यांना पंधरा वर्षाचा निकष लावता तर माझे म्हणणे असे आहे की आजपर्यंत जी लोक या शहरात राहत नाहीत त्यांची नोकरीमध्ये भरती चालू आहे. तुम्ही हा पंधरा वर्षाचा निकष त्या ठिकाणीसुद्धा लावा.

**मा. सभापती साो. :-**

आपण नोकरीमध्ये सुद्धा पंधरा वर्षाचा निकष लावायचा आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, भरती व्हायला उशीर आहे. त्यामुळे तुम्ही पंधरा वर्षाचा निकष अगोदर लावा.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हा विषय रितसर आणण्याचे कारण असे आहे की हा विषय भावनात्मक दृष्टीने येणे आवश्यक आहे. तुम्ही सगळ्यांनी मिळून मा. आयुक्तसाहेबांना पत्र द्या. हे लपवून ठेवण्याचे काहीही कारण नाही. आम्ही एक पार्टी म्हणून पहिल्या दिवसापासून बोलत आलेलो आहोत. आम्ही आता ही मिटींग सुरू होण्यापूर्वी मा. आयुक्तसाहेबांना सांगितलेले आहे.

**जयंत पाटील :-**

हा ठराव महत्त्वाचा आहे. या शहरात पंधरा वर्षे राहत असतील अशा नागरिकांना नोकरी देण्याचे ठरावात नमुद केलेले आहे. त्यामुळे तुम्ही हा ठराव घ्या.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ठराव घ्या. परंतु, माणसाचे रेशनकार्ड इकडचे हवे, त्याची शाळा सोडल्याचा दाखला इकडचा पाहिजे, त्याची घरपट्टी पाहिजे आणि त्या माणसाचे या शहरात पंधरा वर्षाचे वास्तव्य असणे आवश्यक आहे. तुम्ही अशी १७० माणसे घ्या. ती लोक ह्याची, चिठ्ठी आणतात आणि मग बाजारभाव फुटतो. इथे रु. १ लाख आहेत. तिथे रु. ५० हजार आहेत. आम्हाला याचा संशय वाटतो. कारण तो जो कर्मचारी काम करतो तो सफाई कामगार असतो हे योग्य नाही. साहेब, ह्याबाबत कोणालाही आश्चर्य वाटणार नाही . हे मी तुम्हाला ठामपणे सांगतो आमची हया महापालिकेच्या आस्थापनेवर शेकडो माणसे आहेत . आम्ही त्या माणसांसाठी एक रुपयासुध्दा खर्च केलेला नाही तरी सुध्दा ती लोक परमन्ट म्हणून काम करतात . आता तुम्ही या लोंकाना परमन्ट म्हणून काम करतात . आता तुम्ही या लोंकाना परमन्ट कधी करणार ?तो वेगळा विषय आहे . परंतू , या ठिकाणी इन्टरव्हयुपूर्वीच  बाजारभाव होत आहेत . सफाई कामगारांना रु . ५० हजार , रु .६० हजार , रु. १ लाख बाजारभाव लावता . ही शहराची शान आहे की नगरसेवकांची शान आहे की अधिका-यांची शान आहे ते सांगा . कोणीही अधिकारी इन्टरव्हयुला येणारच आहे . आम्ही सकाळी चौकशी केली तेव्हा आम्हाला सन्मा. सदस्य रोहिदास पाटील हे आमच्या हातात नाही , बाहेरची लोकसूध्दा येणार आहेत असे सांगितले गेले परंतू बाहेरची सुध्दा माणसेच येणार आहेत म्हणजे ते अधिकारीच आहेत . जेव्हा एस्.सी , एन.टी ची भरती आली तेव्हा एवढी चर्चा झालेली नव्हती . सगळी माणसे निटनेटकी भरली .

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण एस्.सी, एन.टी च्या वेळेला ओपन पाब्लिसिटी करत नाही. आपण मागासवर्गीय कोटयामधून संबंधित विभागाच्या याद्या घेतो त्यांची उमेदवारांची संख्या फार लिमिटेड असते .

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण २१० उमेदवार भरले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

परंतू पात्र उमेदवार किती येतात ?

**रतन पाटील :-**

साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये असलेल्या स्थानिक एस.सी. आणि एन.टी. उमेदवारांना घेतलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

जर ह्या भरतीमध्ये उमेदवार घेतले नसतील तर आपण स्थानिक किती उमेदवार भरले ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

आपण स्थानिक उमेदवार भरलेले नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण ओपन मागणी केलेली नव्हती हे बरोबर आहे. परंतु, आपण स्थायी समितीच्या मागणीनुसार ओपन मागणी केलेली आहे. आपण त्याप्रमाणे अर्जाची मागणी केलेली आहे आणि आता त्या अर्जाची संख्या वाढलेली आहे. आपण ह्याची चर्चा करणार आहोत. परंतु, चर्चेवर विश्वास ठेवण्याला काहीही अर्थ नाही. ही वस्तुस्थिती आहे. आपण त्याचे सहा पॅनेल केलेले आहेत. सहा पॅनेलच्या माध्यमातुन उमेदवारांचे इन्टरव्ह्यू होतील. जरी बाहेरचे अधिकारी आले तरी त्या पॅनेलवर आपले चार-चार प्रतिनिधी असणार आहेत. बाहेरचेसुध्दा प्रतिनिधी येणार असल्यामुळे शंका घेण्याचे काहीही कारण नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

आता ही भरती ओपन पध्दतीने होणार असल्यामुळे स्थानिकांना प्रथम प्राधान्य द्या अशी आमची मागणी आहे.

**रोहिदास पाटील :-**

जर महासभा आणि स्थायी समितीची एकमुखाने अशी मागणी असेल तर आपली ह्याच्यामध्ये काहीही चुक नाही. तुम्ही प्रशासन म्हणून तुमची भुमिका मांडायला पाहिजे आणि तुम्ही आमच्या भुमिकेशी सहमत व्हायला पाहिजे.

**ग्रिटा फॅरो :-**

स्थानिकांना डावलल्यासारखेच झाले.

**रोहिदास पाटील :-**

प्रशासन आणि प्रतिनिधी दोघे एकत्र असतील तरच काम व्यवस्थित होणार आहे. प्रतिनिधी कोणतीही चुकीची मागणी करित नाही आणि याच्यामध्ये प्रशासनाचे दुमत असता कामा नये. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षी २६ जुलैला पाउुस पडला त्यावेळेला तीन दिवस बदलापूरची माणसे आलेली नव्हती. हा माझा एक अनुभव आहे. तुमचे रेकॉर्ड बघा. त्याच्यावर टिकाटिपणी झाली.

**फॅरो ग्रिटा :-**

जर स्थानिक कर्मचारी असते तर ते लगेच आले असते.

**रोहिदास पाटील :-**

जर तुंम्हाला इकडचे १७० उमेदवार मिळत नसतील तर तुम्ही दुसरे उमेदवार घ्या. परंतु, तुम्ही वाटणी करता असे तुंम्हाला वाटत असेल तर ती वाटणी नाही. आम्ही तुंम्हाला एक सिस्टम म्हणून सांगतो की तुम्ही तुमच्या ८४ नगरसेवकांना विश्वासात घ्या, सभापतींना विश्वासात घ्या. त्यांना स्थान द्या. तुम्ही उपायुक्त आहात. त्यामुळे तुंम्हालासुद्धा स्थान घ्या. सन्माननीय सदस्य रोहीदास पाटील हे एक नगरसेवक आहेत म्हणून आपण त्यांना एक स्थान दिले तर मा. आयुक्तांनासुद्धा एकच सीट द्या. असे मी बोलत नाही. आम्ही मनापासून टाहो फोडून सांगतो की आयुक्त, महापौर, उपमहापौर, सभापतींना स्थान ठेवुन त्यांची भरती करा. जेणेकरुन आपल्याला चांगले म्हणतील. माझ्याकडे आत्ताच्या घटकेला ४७ झेरॉक्स फॉर्म आज सकाळपासून आलेले आहेत. मी हे उमेदवार पाठवून देतो. त्यांचे जरा बघा. त्यांची झेरॉक्स घेउन ठेवा. आम्ही फॉलो-अप करतो असे मला सांगितले गेले. काहीही फरक पडत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला आता मिटिंग चालू असतांना धुळ्याच्या आमदाराने पत्र पाठवलं आहे.

**रोहिदास पाटील :-**

जर ते उमेदवार ज्युनियर इंजिनियर, क्लार्क, किंवा एक्झिक्युटीव्ह असते तर वेगळा विषय होता. साहेब, तुमची सफाई कामगाराबाबतची भूमिका स्पष्ट नाही. म्हणजे तुमची भूमिका लोक स्विकारतील किंवा आपल्याबद्दल चांगले बोलतील अशा प्रकारची नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

हे तुमचे भावनिक मत आहे. परंतु, कायद्याच्या प्रोसिजर प्रमाणे ही भरती या शहरासाठी लिमिटेड करता येत नाही किंवा कायद्यामध्ये त्याबाबत कोणतीही तरतूद नाही. आपण याबाबत मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन निर्णय घेउ. परंतु, मुंबईमध्ये मंबईचे उमेदवार भरले पाहिजेत किंवा ठाण्यामध्ये ठाण्याचे उमेदवार भरले पाहिजेत असे काहीही कम्पलशन नसते.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, भरतीसाठीसुद्धा लिमिट असते.

**रोहिदास पाटील :-**

स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत ही सभा आग्रह धरत आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही कमीत कमी ८० टक्के तरी स्थानिक उमेदवार घ्यावेत असे लिमिट असते.

**रतन पाटील :-**

तुम्ही सुप्रिम कशाला बोलता? महासभा सुप्रिम आहे का? स्थानिक उमेदवारांना नोकरीवर घेण्याचा ठराव महासभेत झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपण हा ठराव कायद्याच्या प्रणालीप्रमाणे घेउन त्याची अंमलबजावणी करित असतो.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त, आपले याबाबत तुमचे काय म्हणणे आहे? ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

महासभेमध्ये जे काही ठरते. आम्ही त्याची अंमलबजावणी करतो असे आंम्हाला आयुक्तसाहेब आणि उप-आयुक्त साहेब रोज महासभेत सांगतात.

**जयंत पाटील :-**

साहेब, आमचे असे म्हणणे आहे की तुंम्हाला ज्या तहेचे तरुण हवे आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता आणि वयोमर्यादा किंवा इतर गोष्टी जी काही हवी असेल असे तरुण या शहरात मिळत असतील तर तुंम्हाला बाहेर जाण्याची काहीही आवश्यकता नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मग या शहरातील तरुण कुठे जातील? हे मला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुम्ही एवढ्या छोट्या घटकाबाबत एवढी चर्चा कशाला करता?

**जयंत पाटील :-**

हा छोटा घटक नाही.

**फॅरो ग्रिटा :-**

हा छोटा घटक नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

कोणत्या उमेदवारांची भरती केले जाईल आणि पॅनेलचा जो काही निर्णय होईल तो निर्णय अंतिम राहिल. परंतु, आपण डिस्कशन म्हणून असे बोलू शकत नाही.

**जयंत पाटील :-**

हा डिस्कशनचा भाग नाही. रेल्वेमध्ये भरती झाली त्यावेळेला कल्याण स्टेशनवर शिवसैनिकांनी एका बिहारीला मारले. नंतर भरती केली नाही. त्यावेळेला तुमचा निकष कुठे गेला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

रेल्वेमध्ये किती महाराष्ट्रीयन आहेत? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तो प्रश्न नाही. परंतु, तुम्ही आंम्हाला आता जो नियम सांगत आहात. मी त्या नियमाला धरुन बोलत आहे. मा. उप-आयुक्त साहेब, तुम्ही असे म्हणता की या भरतीचे उमेदवार या प्रांतातील असावेत. असा कुठलाही नियम नाही. मग त्यांनी तिकडे हिसका दाखवल्यानंतर भरती कशी केली? या शहरातील तरुणांनी असा हिसका दाखवायला पाहिजे का?

**रोहिदास पाटील :-**

आता डिव्हीजन वाईज उमेदवार घेण्याचे रेल्वेला संकेत आहेत. रेल्वेचे ऑफिस सेंट्रल असले तरी त्याठिकाणी राहण्याचा प्रश्न येतो. त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेचे त्यांच्यावर आणि आपल्यावरसुद्धा बर्डन पडते. मग हे सर्व कशाला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

निकषाचा जो मुद्दा आहे. मी त्या मुद्‌द्याबाबत असे सांगू इच्छितो की तो मुद्दा तुम्ही आणि आम्ही ठरविल्यावर तयार होणार नाही. शासनप्रणालीमध्ये ज्या संहीता आहेत. त्या पद्धतीने तो मुद्दा होणार आहे.

**जयंत पाटील :-**

शासनाने हे निकष खूप वर्षापुर्वी ठरविलेले आहेत त्यावेळेला असे तरुण नव्हते आणि त्यावेळेच्या तरुणांना शिक्षण मिळत नव्हते. शिवाय, इतर गोष्टीसुद्धा नव्हत्या. परंतु, आज तशा गोष्टी राहीलेल्या नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

या गोष्टी शासन स्तरावर तसे नियम ठरले आणि अंमलबजावणीसाठी आले.

**जयंत पाटील :-**

ज्यावेळेला शासनाने नियम घडवले त्यावेळेला ग्रामपंचायत होती.

**रोहिदास पाटील :-**

मा. उप-आयुक्त साहेब, मी सांगतो त्याकडे लक्ष द्या. मग तुंम्हाला हा विषय किती अपमानास्पद आहे? ते समजून येईल. तुम्ही त्या अर्जाची थोडीशी छाननी केली हे तुंम्हाला मान्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे २५ टक्के ते २७ टक्के पदवीधारांनी सफाई कामगार यापदासाठी अर्ज केलेले आहेत. हे उमेदवार डिप्लोमा होल्डर, बी. ई., बी. कॉम. आहेत. या सर्वांनी सफाई कामगार या पदासाठी अर्ज केलेले आहेत. मला सफाई कामगाराची नोकरी मिळू दे असे त्यांनी कोणत्या अतःकरणाने अर्ज केलेले असतील त्याचा जरा विचार करा.

**ज्युडी डिसोजा :-**

परंतु, हे उमेदवार गटार साफ करायला जातील का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

आपण सफाई कामगार या पदासाठी डिप्लोमा होल्डरला कसे क्वालिफाय करायचे? हा मुद्दासुद्धा महत्वाचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण त्यांना सफाईचे काम दिले, नाही दिले तो वेगळा विषय आहे. परंतु, तुम्ही त्या उमेदवारांच्यं भावनांचा विचार करा. त्यांची आजची गरज लक्षात घ्या.

**फॅरो ग्रिटा :-**

ते उमेदवार साफसफाई करणार नाही ही एक वेगळी बाब आहे. परंतु, त्या उमेदवारांना गरज आहे म्हणून त्यांनी सफाई कामगार पदासाठी अर्ज केलेले आहेत.

**रतन पाटील :-**

जर या उमेदवारांनी नोकरी केली नाही तर चोऱ्यामाऱ्या करायच्या का?

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, त्या उमेदवारांनी सफाई कामगार या पदासाठी अर्ज केला म्हणजे त्यांना नोकरीची गरज आहे असा त्याचा अर्थ झाला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हा मुद्दा आजच्या चर्चेला होऊ शकत नाही. आपण या मुद्याबाबत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करु. मी तुमच्या सोबत राहिन. कारण मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केल्याशिवाय प्रश्न सुटू शकणार नाही. आपण या ठिकाणी चर्चा करु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

आम्ही या भरतीला विरोध करतो असा याचा अर्थ होत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

परंतु, आपण या मुद्याबाबत इथे चर्चा करु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण मिटींग संपल्यावर मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करुया.

**रोहिदास पाटील :-**

या विषयाबाबत अर्ज करण्याची अशी भुमिका आहे की, समजा सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील हे नगरसेवक आहेतते न्याय देतील म्हणून मी अर्ज करतो. तुमच्याबद्दल अशी अपेक्षा असेल की सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा आहेत. आम्हाला त्या न्याय देतील. म्हणून मी अर्ज करतो. अशी त्या उमेदवारांची तुमच्याकडून अपेक्षा असते.

**प्रकरण क्र. ७८ :-**

दि. ३०/०६/२००६ व दि. ३०/०६/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८० :-**

दि. ३०/०६/२००६ व दि. ३०/०६/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांच्या इतिवृत्तांतांमध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७९ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

साहेब, आजच्या लोकसत्ता पेपरमध्ये एक महत्वाची बातमी आलेली आहे. तुम्ही ती बातमी वाचली असेल. खाजगी सुरक्षा रक्षकाची कसुन चौकशी होणार अशी ती बातमी आहे. आपल्याकडेसुध्दा खाजगी सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. काल अशी बातमी खाहरुख खानच्या बंगल्यावर घडली. त्याच्या सुरक्षा रक्षकाने दुसऱ्याला मारले. सुरक्षा रक्षक वाईट आहेत असे मला म्हणयचे नाही. ते त्यांचे कर्तव्य चांगल्याप्रकारे पार पाडतात. आपल्याकडे काही गनमेन आहेत. ते गनमेन तुमचे संरक्षण करु शकणार नाहीत. समजा, तुमच्याकडे दोन गनमेन आहेत आणि जर सन्मा. सदस्य जयंत पाटील तुमच्याकडे तुमच्यावर ॲटॅक करायला आले तर ते गनमेन तुमचे रक्षण करु शकणार नाहीत. स्वरक्षणासाठी ते बंदूक आहेत. बिहार, यु.पी.ला रिव्हॉल्व्हर ताबडतोब मिळतात. ह्या बातमीमध्ये तसा चांगल्याप्रकारक उल्लेख केलेला आहे. माझ्याकडे जवळजवळ ५३ गनमॅन आहेत. ते गनमेन फक्त शोसाठी आहेत. आपण त्यांना गनमेनचा पगार देतो. आपल्याला गनमेन हवे होते. म्हणून आपण कॉन्ट्रॅक्टरकडे गनमेनची मागणी केलेली होती. आणि कॉन्ट्रॅक्टरने त्याच्या सोयीनुसार गनमेन दिलेले आहेत. परंतु, हे गनमेन आपले संरक्षण करतात का? हा महत्वाचा मुद्दा आहे. बहुतेक करुन त्या गनमेनकडे स्वतःच्या संरक्षणासाठी बंदुका आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

स्थायी समितीने जी एजन्सी निश्चित केलेली आहे. त्याबाबत मी असे सांगने की, सुरक्षा रक्षकांनी आपल्याकडे यापूर्वीसुध्दा काम केलेले होते. त्यांच्याकडे ज्याकाही गन आहेत. त्यांची संबंधित पोलिस स्टेशनकडून नोंदणी करुन घेतलेली आहे आणि त्या नोंदी गनमेनच्या सर्व्हिससाठी वापरण्याकरिता आहेत. सन्मा. सदस्य जयंत पाटील, आपण गनमेनची संख्या कमी करुन टाकलेली आहे.

**जयंत पाटील :-**

मी तुम्हाला नोंदीबाबत विचारत नाही किंवा त्यांच्या गन खोट्या आहेत असेसुध्दा बोलत नाही. त्या गनमेनच्या गन खऱ्या आहेत. परंतु, त्या गन त्यांच्या स्वतःच्या संरक्षणासाठी आहेत. जर उद्या तुमच्यावर ॲटॅक वगैर झाला तर तो गनमेन त्या समोरच्या माणसाला मारु शकत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

कुठलाही गनमेन परिस्थिती कंट्रोलच्या बाहेर असली किंवा समोरच्या माणसाने ॲटॅक केला तर डायरेक्ट मारु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

परंतु, पोलिस मारु शकतात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पोलिससुध्दा मारु शकत नाही.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या म्हणण्यानुसार गनमेनने सेल्फ डिपेन्स लायसन्स घेतलेले आहे हे बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

गनमेनने सेल्फ डिफेन्डस लायसन्स घेतलेले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपले गनमेन ॲटॅक करण्यासाठी नाहीत. त्या गनमेनचे तेवढे स्टॅंडर्ड नाही.

**जयंत पाटील :-**

मग त्या गनमेनची गरज नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही आता धोरण ठरवा. आम्ही त्या धोरणाप्रमाणे ते गनमेन काढून टाकतो.

**जयंत पाटील :-**

जर ते गनमेन संरक्षण करु शकत नाही तर त्या गनमेननला कामावर ठेवण्यात काहीही अर्थ नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

आपण साधे हत्यारी किंवा बिन-हत्यारी ठेवूया.

**शशिकांत भोईर :-**

जर तुमची बॅंकेत कॅश जात असताना त्या कॅशवर ॲटॅक केला तर ते गनमेन त्यावेळेला त्या माणसावर ॲटॅक करणार का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

ते गनमेन त्यावेळेला त्या माणसावर नक्कीच ॲटॅक करतील.

**शशिकांत भोईर :-**

त्यावेळेला ॲटॅक करतील. परंतु, आज आपले आयुक्त किंवा महापौर येताना असा ॲटॅक झाला तर ते गनमेन बोलतील की, मी कसा ॲटॅक करणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

तुम्ही याचे गांभीर्य लक्षात घ्या. जर कुठलेही सेक्युरिटी गार्ड शासनाचे असले तरी ते उगीचच कोणावर ॲटॅक करित नाहीत. त्यावेळेला त्या परिस्थितीचे गांभीर्य असते. आमच्या सोबत सार्वजनिक जीवनामध्ये काही घटना घडलेल्या आहेत. म्हणून लगेच कोणावर ॲटॅक करायला पाहिजे असे घडत नाही.

**एस. ए. खान :-**

साहेब, जर आमदाराचे वगैरे सुरक्षा रक्षक असेल तर त्या आमदारावर कोणी ॲटॅक केला तर त्या सुरक्षा रक्षकाला त्या माणसावर फायरिंग करण्याचा अधिकार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, तो सेक्युरिटी गार्ड पोलिसांचा असतो. आणि हा प्रायव्हेट सेक्युरिटी गार्ड आहे.

**एस. ए. खान :-**

सेक्युरिटी गार्ड प्रायव्हेट असला तरी त्या सेक्युरिटी गार्डला ॲटॅक करण्याचा अधिकार नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपण या सेक्युरिटी गार्डची नेमणूक केलेली आहे. तुम्ही त्यांच्या विषयी काय करणार? ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण फक्त लोकांना धाक दाखविण्यासाठी गार्ड नेमलेला आहे. या गार्डकडे बंदुक आहे असा सायकोलॉजी रुल इफेक्ट दाखविण्यासाठी गार्ड नेमलेला आहे. याच्यामध्ये बाकी दुसरे काहीही नाही.

**एस. ए. खान :-**

आपण फक्त लोकांना धाक दाखविण्यासाठी गार्ड नेमलेला आहे.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर शहरातील मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सेक्युरिटी गार्ड नेमलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

मिरा भाईंदर शहरातील मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सेक्युरिटी गार्ड नेमावा एवढाच उद्देश त्याच्यामध्ये आहे.

**जयंत पाटील :-**

कोणावर ॲटॅक करायचा नाही तरी आपण त्याच्यासाठी प्रचंड पैसा देतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो.) :-**

मी तुमच्या सुचनेप्रमाणे सांगु इच्छितो की, आता साधारणपणे २१ हत्यारी ठेवलेले आहेत. मी तुम्हाला ती संख्या नंतर सांगेन. ती संख्या तीन वेळेपेक्षा जास्त होती. आपण ते सर्व हत्यारी कमी केलेल आहेत. आपण ती संख्या १/४ पर्यंत आणलेली आहे. जेवढे हत्यारी आवश्यक होते तेवढेच हत्यारी घेतलेले आहेत. कारण उद्या अशा काही बाबी निघाल्या तर कोणीही जबाबदारी घेणार नाही. जेवढी रेकगनाईस आणि आयडेन्टीफाय

हत्यारे आहेत. आपण तेवढेच हत्यारी वापरलेले आहेत. आपण त्यांना बिना हत्यारीमध्ये कन्व्हरर्शन करुन घेतलेले आहे. आम्ही ती जबाबदारी घेतलेली नाही. याच्यामध्ये आणखी प्रायोरिटी निश्चित करुन जास्तीत जास्त कमी करता येतील तेवढे हत्यारी कमी करण्याचा प्रयत्न करु.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही योग्य ती दक्षता घ्या.

**जयंत पाटील :-**

आमच्या नवघरच्या स्मशानामध्ये गनमेनची काहीही आवश्यकता नाही. आम्ही स्मशानामध्ये मेलेली माणसे घेऊन जातो. मग तो गनमेन कोणाला मारणार आहे ते सांगा.

**रतन पाटील :-**

सदरचा विषय महासभेमध्ये आलेला होता. या विषयावर महासभेमध्ये विचारविनिमय झालेला होता. मग हा विषय महासभेतच जायला पाहिजे. आपण या विषयाला मंजुरी देऊ शकत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या विषयाबाबत महासभेने फायनल अधिकार दिलेले आहेत. तसेच, महासभेने या विषयावर धोरण निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. आपल्याला जी डिफरन्स अमाउन्ट कमी करायची आहे, ती अमाउन्ट कमी करण्याचे स्थायी समितीला अधिकार आहेत.

**रतन पाटील :-**

हा संपूर्ण मिरा भाईंदरचा प्रभागवाईस डिफरन्स दिलेला आहे का?

**शशिकांत भोईर :-**

ज्यांनी अर्ज केलेला आहे. त्यांच्याच डिफरन्स ॲडजेस्ट करायचा आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जी प्रकरणे निकाली निघालेली आहेत तिचं प्रकरणे घ्यायची आहेत.

**शशिकांत भोईर :-**

त्या प्रकरणामध्ये भाईंदर पूर्वेचे प्रकरणसुध्दा येते.

**रतन पाटील :-**

म्हणजेच रु. १७ लाख ८० हजार ७७७/- याबाबत श्री. अजित पाटील साहेबांनी खुलासा करावा.

**अजित पाटील :-**

आपण तक्रारी असल्या तर दाखल करण्याबाबत जाहिर नोटीस दिलेली होती. त्यांना नोटीस देऊन एक महिना झालेला आहे. आपण दि. १८ एप्रिल रोजी नोटीस दिलेली होती. आणखी एक महिन्याचा कालावधी वाढवावा असा महासभेने निर्देश दिलेला होता. आपण दि. १८ एप्रिल ते दि. २३ जुनपर्यंत दोन महिन्याच्या नोटीसा देऊन अर्ज मागवलेले होते. त्या मुदतीत ६०० अर्ज आलेले होते. ६०० अर्जाची छाननी केली. त्या छाननीनुसार प्रथमतः ज्या दराने सगळ्यांना कर आकारणी केली. त्या दराने पुन्हा सगळ्यांना रिव्हाईस करुन कर आकारणी केली. नगरपालिकेला रु. १७ लाख ८० हजार ७७७/- विभागवाईस नुकसान झालेले आहे. ते नुकसान झालेले असले तरी जी प्रथम कर आकारणी झालेली होती. ती बेस पकडून आपण ह्या नुकसानाला कायदेशीर स्वरुप दिलेले आहे. त्यामुळे लोकांवरील अन्याय दुर झालेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण या ठिकाणी वगळले गेलेले आहे असे बोलु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काहीही वगळले गेलेले नाही.

**शशिकांत भोईर :-**

ज्यावेळेला एक महिन्याची वाढीव मुदत देण्याबाबत ठराव मांडला. त्या दरम्यान सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी तीन महिन्याची मुदत देण्याबाबत सुचना दिलेली होती. परंतु, आपण तरीसुध्दा एक महिन्याचीच मुदत दिलेली होती.

**अजित पाटील :-**

आपण नंतर एक महिना मुदत वाढवलेली होती.

**शशिकांत भोईर :-**

आपण एक महिन्याचीच मुदत ठेवलेली होती. आपण आधी सुचना दिली तेव्हा सहा महिन्याची मुदत दिलेली होती. त्यांनतर सुचना आल्यावर तीन महिन्याची मुदत मागितलेली होती. परंतु, तरीसुध्दा एक महिन्याची मुदत दिली. दुसरी गोष्ट अशी आहे की लोक गावाला गेल्यानंतर सगळी लोक गावावरुन जुन महिन्यामध्येच परत येतात असे काहीही नसते. काही लोक जुलै महिन्यामध्ये येतात आणि काही लोक गावाला राहण्याची शक्यता आहे. आता माझ्या प्रभागातील लोक गावावरुन वेळेवर परत आले असतील परंतू, अन्य प्रभागातील लोक वेळेवर आले असतील की, नाही ते मला माहिती नाही. काही लोकांनी अर्ज दिलेले नाहित. परंतू, जी काही लोक राहिली असतील त्यांचे काय?

**शशिकांत भोईर :-**

परंतू, आपण सगळयांसाठी धोरण करणार आहोत.

**रतन पाटील :-**

आपण एक महिन्याची मुदत दिली आणि त्यांच्यानंतर अजून एक महिना वाढवलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तसा विषय होत नाही. प्रशासनाने या विषयाचे काहीही कारण नसताना नेहमी कन्फ्युजन केलेले आहे. हा विषय दोन - तीन वर्षापासून चाललेला होता. मी पाहिल्यापासून सांगत आलेलो आहे की आपण नागरिकांना न्याय दयायला पाहिजे इतकी तुट होइल असे बोलून प्रशासनाने सत्ताधारी पक्षाची दिशाभूल केली. आताच्या घटकेला दोन महिन्याची वेळ देऊन फक्त रु. १७ लाखाची अमाउन्ट आली. रुपये अडीच कोटीचे बजेट कमी होइल असा निर्णय नको होता असे सुध्दा सांगितले गेले. आताच्या बजेटमध्ये फक्त एवढीच दुरुस्ती करा की, ज्यांनी अर्ज केलेले आहेत. त्याबाबत सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी बरोबर सांगितलेले होते. ज्यांनी अर्ज केलेले होते आम्ही फक्त त्या लोकांचाच विचार केला. परंतु, अनेक लोकांचे अर्ज तयार झालेले नाहित. काही लोकांपर्यत तो विषय पोहोचलेला नाही. आता सोसायटीमध्ये हे गेलेले होते, ह्यांनी अर्ज केलेला होता. म्हणून ह्यांना सुट मिळाली असे सांगतात. त्यामुळे मी जागा झालो, त्या जाग्या झाल्या असा विषय होईल. तो विषय नियमात आहे. महासभेचा ठराव मुदतीचा नाही. ज्या पद्धतीने कर आकारणी झालेली आहे. त्याच्या अनुषंगाने कर आकारणी व्हावी असे महासभेच्या ठरावामध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे. त्यामुळे आम्हाला रु. १७ लाखाला विरोध देण्याचे काहीही कारण नाही. रु. १७ लाखाचे रु. २७ लाख झाले तरी ही सभा किंवा महासभा निर्णय देईल असे वाटले तरी आपण त्याला आधीच परवानगी घेतलेली आहे. त्यामुळे तुम्ही सांगाल की हे एवढे झाले आणि संपले. परंतु, जर या बाई आल्या किंवा ही व्यक्ती आली तर तुम्ही लगेच सांगाल का? मुदत संपून गेलेली आहे आणि याबाबत स्थायी समितीमध्ये गोंधळ झाला. व रु. १७ लाखाला मंजूरी घेतली.

**शशिकांत भोईर :-**

ही मुदत तुम्ही न ठरवता प्रशासनाने ठरवलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

ही मुदत तुम्ही ठरवलेली नाही. ही मुदत महासभेने ठरवलेली आहे.

**रतन पाटील :-**

महासभेने मुदत ठरवून दिलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुमच्याकडे नियमानुसार जे अर्ज येतील. तुम्ही ते अर्ज सन्मानाने स्विकारुन त्यांना न्याय दिला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आपण ज्यावेळेला विरोधात प्रस्ताव मांडलेला होता. त्यावेळेला मी मुदतीबाबत सांगितलेले होते.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना मुदत दिली पाहिजे व सन्मानाने न्याय दिला पाहिजे. त्यांना वंचित ठेवता कामा नये. त्यांना पुन्हा पुन्हा फेऱ्या मारायला लावण्याची काहीही आवश्यकता नाही. ही सभा तुम्हाला निर्देश देते.

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की जर प्रशासनाच्या निदर्शनात घरपट्टी आकारणीबाबत असेल आणि जर त्यांचे अर्ज आलेले नसतील तर आपल्याला सदनिका किंवा दुकानांना कर आकारणी ज्यादा दराने केलेली आहे हे माहिती आहे. त्यामुळे आपणच जबाबदारीने त्यांची कर आकारणी समान करुन द्यावी. म्हणजे हा प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल.

**अजित पाटील :-**

आम्ही लोकांना पेपर नोटिस देउन कर आकारणी बाबत माहिती दिलेली होती. आणि आम्ही कर आकारणी बाबत सदस्यांनासुध्दा कळविले होते.

**रोहिदास पाटील :-**

तो विषय बरेच दिवस उशीरा गेला म्हणून आपण पेपर नोटिस द्यायचा आग्रह धरलेला होता.

**अजित पाटील :-**

आपण ज्यांना ॲप्लीकेशन द्यायला सांगितलेले होते. त्यांनी अजुनपर्यंत ॲप्लीकेशन दिलेले नाहीत.

**जेन्वी अल्मेडा :-**

जर असे ॲप्लीकेशन उशीरा आले तर आपण ते ॲप्लीकेशन स्विकारावे असे मला वाटते.

**ग्रिटा फॅरो :-**

अजुनसुध्दा ॲप्लीकेशन येतील.

**अजित पाटील :-**

येत्या दोन महिन्यात एकही ॲप्लीकेशन आलेले नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

ॲप्लीकेशन आले नाही तर प्रश्न येत नाही. परंतु, जर असे ॲप्लीकेशन आले तर तुम्ही ते स्विकारा.

**ग्रिटा फॅरो :-**

जर आणखी ॲप्लीकेशन येणार असतील तर तुम्ही अजुन दोन महिन्याची मुदत वाढवून द्या.

**शशिकांत भोईर :-**

माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, सभागृहाने गोष्टीचा गांभीर्याने विचार करावा. आणखी अर्ज असतील आता समजा, रु. १७ लाखाचे असतील तर ते कमीत कमी रु. ५ लाखापर्यंत यायला पाहिजे. आपण असे न मागवता प्रशासनाने तिकडून केले तर लोकांच्या समस्या सुटतील आणि उत्तम होईल. मी तर असे सांगेन की, त्यांना मुदत न देता पुढे-पुढे वाढवत ठेवावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

त्याच्यामध्ये खरे म्हणजे ॲक्युअल व्हायला पाहिजे.

**अजित पाटील :-**

साहेब, सध्या व्हास्ट पब्लिसिटी केली आहे.

**रोहिदास पाटील :-**

आमचा वाद पब्लिसिटीबाबत नाही. तुम्ही कुठे लपवून ठेवले किंवा कुठल्या पेपरला दिले असे आम्ही सांगत नाही. महासभेचा जो निर्णय ॲप्लीकेबल आहे. तुम्ही त्याच निर्णयाला न्याय द्या. म्हणजे जी लोक पिरियरडमध्ये अर्ज करतील त्यानांच न्याय द्यायचा असा अर्थ होत नाही. आपण ही गोष्ट लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी सभागृहामध्ये आग्रह धरला की, हे पेपरमध्ये छापा. त्याचे हॅन्ड बिल काढा.

**शशिकांत भोईर :-**

याच्यावर महासभेचा निर्णय होता. म्हणून हा विषय महासभेत जाऊ द्या.

**रतन पाटील :-**

महासभेचा निणर्य होता मग हा विषय महासभेत जाऊ दे.

**ग्रिटा फॅरो :-**

ह्या विषयावर महासभेत निर्णय झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय महासभेत आलेला होता.

**रतन पाटील :-**

हा विषय पुन्हा महासभेत जाऊ द्या.

**शशिकांत भोईर :-**

महासभेने ह्या विषयाला मंजुरी दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय महासभेमध्ये मंजुरीला जाऊ द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इथे मंजुरी घेणे वेगळा विषय आहे. आणि महासभेची मंजुरी घेणे हा वेगळा विषय आहे. त्यामुळे आपण या विषयाला मंजुरी देउन हा विषय महासभेमध्ये घेउया.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला ही सभा दुरुस्तीसहित रु. १७ लाखला मंजुरी देत आहे. कारण हा वादाचा विषय नाही.

**शशिकांत भोईर :-**

रु. १७ लाखाचा विषय येत नाही. आपण बघितले तर अन्य वॉर्डमधीलसुध्दा निघतील.

**रोहिदास पाटील :-**

मी सभागृहाला माहिती दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण मंजुरी मागितलेली आहे आणि उत्पन्नाची घट होते त्यास मंजुरी मिळेल असे सांगितलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला मंजुर आहे. आमचा ठराव असा आहे की आम्ही ह्याला मंजुरी देतो. परंतु, ह्याच्या पुढे ज्यांचे अर्ज उशीरा येतील त्यालासुध्दा मंजुरी द्या.

**ग्रिटा फॅरो :-**

याच्यापुढे जे कोणाचे उशीरा अर्ज येतील त्यांनासुध्दा मंजुरी द्या.

**रोहिदास पाटील :-**

जनसामान्याना कुठल्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. कोणीही पुन्हा-पुन्हा हेलपाटे घालता कामा नये. ह्यासाठी अशा लोकांचे अर्ज स्विकारावेत.

**जेन्वी डिसोझा :-**

साहेब, उशिरा आलेले अर्ज स्विकारावेत असे ह्या ठरावात नमुद करा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जी काही दुरूस्ती कराल ती वाचून दाखवा कारण ही साधी गोष्ट नाही.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला प्रशासनाने निवडून न देता नागरिकांनी निवडून दिलेले आहे हे लक्षात ठेवा याचा विचार करुन जी एकूण रक्कम येईल त्याच्यासुद्धा ह्याच्यामध्ये उल्लेख करावा.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामध्ये तुमचा किंवा आमचा किंवा अन्य कोणाचाही दोष नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी ह्याबाबत माझे प्रशासकीय मत मांडतो की महापालिकेच्या अधिनियमामध्ये कराच्या आकारणीची एक पद्धत आहे त्या पद्धतीने हे कर अंतिम झालेले आहेत. अंतिम झालेल्या करामध्ये डिफरन्स होते हे सन्मा. सदस्यांची मागणी होती. वास्तविक कोणतेही कर अंतिम करताना संबंधित घर मालकाला आक्षेप घेण्याची तरतुद होती. काही घरमालक किंवा भोगवटा धारकांनी त्या तरतुदीच्या उपभोग किंवा फायदा घेतलेला नव्हता आणि त्यांना अनावधानाने टॅक्स अंतिम झालेले होते. त्यामुळे त्याच्यामध्ये फरक जाणवत होता तो टॅक्स कमी-जास्त प्रमाणात होता. ते टॅक्स कमी करण्याची कोणतीही तरतुद अधिनियमात नव्हती म्हणून निर्णय करण्यात झालेला नव्हता. महासभेने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही पूर्ण केलेली आहे. प्रशासनाने एक पॅनेल तयार करुन त्याच्यामध्ये लोकांचे अर्ज घेउन ते अर्ज डिसाईड केलेले आहेत आणि त्यामधील तफावतीची रक्कम आपल्याकडे र्निलेखीत करण्यासाठी सादर केलेली आहे. याशिवाय भोगवटाधारक आणि मालकाच्या अटी असतील किंवा रक्कमेमध्ये काही तफावत असेल तर तुम्ही त्यांना आणखी मुदत ठरवून द्यावी असे माझे म्हणणे आहे.

**रोहिदास पाटील :-**

तीन महिन्याची मुदत दिलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आता श्री. अजित पाटील आहेत. तर तुम्ही त्यांना आणखी दोन महिन्याची मुदत ठरवून द्या.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही श्री. अजित पाटील साहेबांचा मान ठेवून मुदत दिलेली होती.

**फॅरो ग्रिटा :-**

तीन महिन्याची मुदत चालेल ना.

**अजित पाटील :-**

आपल्याला याचा एन्ड करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तीन महिन्याचा पिरियड घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही दोन महिन्याची मुदत ठरवा आणि दोन महिन्याची मुदत सफिशन्ट आहे. माझी सन्मा. सदस्यांना अशी विनंती आहे की जर असे कोणाचे आक्षेप झाले तर त्याबाबत प्रशासनाला कॉन्टॅक्ट करायला सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दिड महिन्याची मुदत घ्या.

(सन्मा. सदस्य ॲड. श्री. एस्. ए. खान ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले)

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

दि. ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

दि. ३० नोव्हेंबर अखेरपर्यंत मुदतवाढ द्यायची आहे.

**प्रकरण क्र. ७९ :-**

एकाच इमारतीमध्ये वेगवेगळ्या दराने मालमत्तेला केलेली कर आकारणी समान दराने केल्याने महसुलामध्ये झालेल्या उत्पन्नाच्या घटीस मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काही इमारतीमध्ये फ्लॅट धारकांना वेगवेगळ्या दराने कर आकारणी झाली होती. सदरहू कर आकारणी समान दराने करणे बाबत **महासभा ठराव क्र. ५७, दि. १९/१०/२००५** अन्वये अशा प्रकारच्या मालमत्ता धारकांच्या हरकती दि. १५/०४/२००६ व दि. १८/०५/२००६ रोजी वेगवेगळ्या वृत्तपत्रांत नोटीस देउन मागविण्यात आल्या होत्या. २ महिन्याच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे प्रभाग निहाय हरकती प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | प्रभागांचे नाव | अर्ज |
|---|---|---|
| १ | मुर्धा ते उत्तन | --- |
| २ | भाईंदर (पश्चिम) | ३३७ |
| ३ | भाईंदर (पुर्व) | २६२ |
| ४ | मिरारोड (पुर्व) | ००४ |

वरिलप्रमाणे प्राप्त झालेल्या हरकतीची छाननी करण्यांत आली. त्यानुसार महानगरपालिका आकारणी रजिस्टरनुसार इमारतीमधील फ्लॅट धारकांस प्रथमतः ज्या दराने करक आकरणी केली होती ते वर्ष त्या इमारतीचे वापराचे वर्ष असल्याने त्यावेळी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे सर्व इमारतीमधील फ्लॅट धारकांस आकारणी करणे न्यायाचे होणार आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या फ्लॅट धारकांच्या मालमत्तेस सुधारित कर आकारणी केल्याने खालीलप्रमाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये घट होणार आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | घट |
|---|---|---|
| १ | १ | ------ |
| २ | २ | ५,८७,८५८.०० |
| ३ | ३ | ११,२३,९३७.०० |
| ४ | ४ | ६८,९८२,.०० |
| **एकूण** | | **१७,८०,७७७.००** |

वरिलप्रमाणे महसुली उत्पन्नात घट होणार आहे. इमारतीमधील फ्लॅट धारकांना समान दराने कर आकारणी केल्याने त्यांच्यावर झालेला अन्याय आता दूर झाला आहे त्यामुळे सदर घटीस मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारच्या दि. ३०/११/२००६ पर्यंत येणाऱ्या प्रकारणांवर सुधारित दराने कर आकारणी करणेस मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान. अनुमोदन :- श्रीम. ग्रिटा फॅरो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसेवकांनी प्रकरण क्र. ८० चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

श्री. खांबीत तुम्ही रस्ते तयार करणार म्हणजे नेमके काय करणार? पुर्नदृष्टीकरण करणार, रिपेरिंग करणार की नेमके काय करणार ?

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला डांबरीकरण करायचे आहे की, आर.सी.सी. करायचे आहे?

**रोहिदास पाटील :-**

प्रशासन आणि प्रतिनिधी दोघे एकत्र असतील तरच काम व्यवस्थित होणार आहे. प्रतिनिधी कोणतीही चुकीची मागणी करित नाही आणि याच्यामध्ये प्रशासनाचे दुमत असता कामा नये. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षी २६ जुलैला पाउुस पडला त्यावेळेला तीन दिवस बदलापूरची माणसे आलेली नव्हती. हा माझा एक अनुभव आहे. तुमचे रेकॉर्ड बघा. त्याच्यावर टिकाटिपणी झाली.

**फॅरो ग्रिटा :-**

जर स्थानिक कर्मचारी असते तर ते लगेच आले असते.

**रोहिदास पाटील :-**

जर तुंम्हाला इकडचे १७० उमेदवार मिळत नसतील तर तुम्ही दुसरे उमेदवार घ्या. परंतु, तुम्ही वाटणी करता असे तुंम्हाला वाटत असेल तर ती वाटणी नाही. आम्ही तुंम्हाला एक सिस्टम म्हणून सांगतो की तुम्ही तुमच्या ८४ नगरसेवकांना विश्वासात घ्या, सभापतींना विश्वासात घ्या. त्यांना स्थान द्या. तुम्ही उपायुक्त आहात. त्यामुळे तुंम्हालासुद्धा स्थान घ्या. सन्माननीय सदस्य रोहीदास पाटील हे एक नगरसेवक आहेत म्हणून आपण त्यांना एक स्थान दिले तर मा. आयुक्तांनासुद्धा एकच सीट द्या. असे मी बोलत नाही. आम्ही मनापासून टाहो फोडून सांगतो की आयुक्त, महापौर, उपमहापौर, सभापतींना स्थान ठेवुन त्यांची भरती करा. जेणेकरुन आपल्याला चांगले म्हणतील. माझ्याकडे आत्ताच्या घटकेला ४७ झेरॉक्स फॉर्म आज सकाळपासून आलेले आहेत. मी हे उमेदवार पाठवून देतो. त्यांचे जरा बघा. त्यांची झेरॉक्स घेउन ठेवा. आम्ही फॉलो-अप करतो असे मला सांगितले गेले. काहीही फरक पडत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मला आता मिटिंग चालू असतांना धुळ्याच्या आमदाराने पत्र पाठवलं आहे.

**रोहिदास पाटील :-**

जर ते उमेदवार ज्युनियर इंजिनियर, क्लार्क, किंवा एक्झिक्युटीव्ह असते तर वेगळा विषय होता. साहेब, तुमची सफाई कामगाराबाबतची भूमिका स्पष्ट नाही. म्हणजे तुमची भूमिका लोक स्विकारतील किंवा आपल्याबद्दल चांगले बोलतील अशा प्रकारची नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

हे तुमचे भावनिक मत आहे. परंतु, कायद्याच्या प्रोसिजर प्रमाणे ही भरती या शहरासाठी लिमिटेड करता येत नाही किंवा कायद्यामध्ये त्याबाबत कोणतीही तरतूद नाही. आपण याबाबत मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन निर्णय घेउु. परंतु, मुंबईमध्ये मंबईचे उमेदवार भरले पाहिजेत किंवा ठाण्यामध्ये ठाण्याचे उमेदवार भरले पाहिजेत असे काहीही कम्पलशन नसते.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, भरतीसाठीसुद्धा लिमिट असते.

**रोहिदास पाटील :-**

स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत ही सभा आग्रह धरत आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही कमीत कमी ८० टक्के तरी स्थानिक उमेदवार घ्यावेत असो आमचा आग्रह आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही सुप्रिम कशाला बोलता? महासभा सुप्रिम आहे का? स्थानिक उमेदवारांना नोकरीवर घेण्याचा ठराव महासभेत झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

आपण हा ठराव कायद्याच्या प्रणालीप्रमाणे घेउुन त्याची अंमलबजावणी करित असतो.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त, आपले याबाबत तुमचे काय म्हणणे आहे? ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

महासभेमध्ये जे काही ठरते. आम्ही त्याची अंमलबजावणी करतो असे आंम्हाला आयुक्तसाहेब आणि उप-आयुक्त साहेब रोज महासभेत सांगतात.

**जयंत पाटील :-**

साहेब, आमचे असे म्हणणे आहे की तुंम्हाला ज्या तऱ्हेचे तरुण हवे आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता आणि वयोमर्यादा किंवा इतर गोष्टी जी काही हवी असेल असे तरुण या शहरात मिळत असतील तर तुंम्हाला बाहेर जाण्याची काहीही आवश्यकता नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मग या शहरातील तरुण कुठे जातील? हे मला सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

तुम्ही एवढ्या छोट्या घटकाबाबत एवढी चर्चा कशाला करता?

**जयंत पाटील :-**

हा छोटा घटक नाही.

**फॅरो ग्रिटा :-**

हा छोटा घटक नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

कोणत्या उमेदवारांची भरती केले जाईल आणि पॅनेलचा जो काही निर्णय होईल तो निर्णय अंतिम राहिल. परंतु, आपण डिस्कशन म्हणून असे बोलू शकत नाही.

**जयंत पाटील :-**

हा डिस्कशनचा भाग नाही. रेल्वेमध्ये भरती झाली त्यावेळेला कल्याण स्टेशनवर शिवसैनिकांनी एका बिहारीला मारले. नंतर भरती केली नाही. त्यावेळेला तुमचा निकष कुठे गेला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े. ) :-**

रेल्वेमध्ये किती महाराष्ट्रीयन आहेत? ते सांगा.

**जयंत पाटील :-**

तो प्रश्न नाही. परंतु, तुम्ही आंम्हाला आता जो नियम सांगत आहात. मी त्या नियमाला धरुन बोलत आहे. मा. उप-आयुक्त साहेब, तुम्ही असे म्हणता की या भरतीचे उमेदवार या प्रांतातील असावेत. असा कुठलाही नियम नाही. मग त्यांनी तिकडे हिसका दाखवल्यानंतर भरती कशी केली? या शहरातील तरुणांनी असा हिसका दाखवायला पाहिजे का?

**रोहिदास पाटील :-**

आता डिव्हीजन वाईज उमेदवार घेण्याचे रेल्वेला संकेत आहेत. रेल्वेचे ऑफिस सेंट्रल असले तरी त्याठिकाणी राहण्याचा प्रश्न येतो. त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेचे त्यांच्यावर आणि आपल्यावरसुद्धा बर्डन पडते. मग हे सर्व कशाला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

निकषाचा जो मुद्दा आहे. मी त्या मुद्द्याबाबत असे सांगू इच्छितो की तो मुद्दा तुम्ही आणि आम्ही ठरविल्यावर तयार होणार नाही. शासनप्रणालीमध्ये ज्या संहीता आहेत. त्या पद्धतीने तो मुद्दा होणार आहे.

**जयंत पाटील :-**

शासनाने हे निकष खूप वर्षापुर्वी ठरविलेले आहेत त्यावेळेला असे तरुण नव्हते आणि त्यावेळेच्या तरुणांना शिक्षण मिळत नव्हते. शिवाय, इतर गोष्टीसुद्धा नव्हत्या. परंतु, आज तशा गोष्टी राहीलेल्या नाहीत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

या गोष्टी शासन स्तरावर तसे नियम ठरले आणि अंमलबजावणीसाठी आले.

**जयंत पाटील :-**

ज्यावेळेला शासनाने नियम घडवले त्यावेळेला ग्रामपंचायत होती.

**रोहिदास पाटील :-**

मा. उप-आयुक्त साहेब, मी सांगतो त्याकडे लक्ष द्या. मग तुंम्हाला हा विषय किती अपमानास्पद आहे? ते समजून येईल. तुम्ही त्या अर्जाची थोडीशी छाननी केली हे तुंम्हाला मान्य आहे. माझ्या माहितीप्रमाणे २५ टक्के ते २७ टक्के पदवीधारांनी सफाई कामगार यापदासाठी अर्ज केलेले आहेत. हे उमेदवार डिप्लोमा होल्डर, बी. ई., बी. कॉम. आहेत. या सर्वांनी सफाई कामगार या पदासाठी अर्ज केलेले आहेत. मला सफाई कामगाराची नोकरी मिळू दे असे त्यांनी कोणत्या अतःकरणाने अर्ज केलेले असतील त्याचा जरा विचार करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

आपण सफाई कामगार या पदासाठी डिप्लोमा होल्डरला कसे क्वालिफाय करायचे? हा मुद्दासुद्धा महत्वाचा आहे. तुम्ही त्यांची कदर करणार नाही का?

**ज्युडी डिसोजा :-**

परंतु, हे उमेदवार गटार साफ करायला जातील का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

आपण सफाई कामगार या पदासाठी डिप्लोमा होल्डरला कसे क्वालिफाय करायचे? हा मुद्दासुद्धा महत्वाचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण त्यांना सफाईचे काम दिले, नाही दिले तो वेगळा विषय आहे. परंतु, तुम्ही त्या उमेदवारांच्यं भावनांचा विचार करा. त्यांची आजची गरज लक्षात घ्या.

**फॅरो ग्रिटा :-**

ते उमेदवार साफसफाई करणार नाही ही एक वेगळी बाब आहे. परंतु, त्या उमेदवारांना गरज आहे म्हणून त्यांनी सफाई कामगार पदासाठी अर्ज केलेले आहेत.

**रतन पाटील :-**

जर या उमेदवारांनी नोकरी केली नाही तर चोऱ्या - माऱ्या करायच्या का?

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, त्या उमेदवारांनी सफाई कामगार या पदासाठी अर्ज केला म्हणजे त्यांना नोकरीची गरज आहे असा

**जयंत पाटील :-**

मुंबई हायकोर्टाने असे आदेश दिलेले आहेत. त्यांनी सांगितलेले आहे.

**दिपक खांबित :-**

आपण ३० ऑगस्टपर्यंत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

**रतन पाटील :-**

तुम्ही तेसुध्दा ठरावामध्ये नमुद करा.

**जयंत पाटील :-**

ठरावात तसे नमुद करुन घ्या.

**मा. सभापती :-**

पाऊस थांबला नाही तर नंतर मुंबईला रस्त्यावर जसे सिमेन्ट किंवा डांबर वगैरे टाकतात. तसे तुम्ही आपल्याकडेसुध्दा टाकून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

काहीतरी नवीन सिस्टिम वापरा.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी अशी सुचना मांडली की आपण ऑन लाईन केबल प्रक्षेपण करतो आणि समुद्रात जी लाईटिंग करतो ती व्यवस्थित करावी.

**जयंत पाटील :-**

आपण त्याचे पैसे दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

पैसे दिले हे खरे आहे. परंतु, नक्की काय झाले ते सांगा.

**रतन पाटील :-**

ती आपली लाईटिंग आहे की महापालिकेची लाईटिंग आहे ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

संपूर्ण गणपती विसर्जनात केले तर दोन दिवे लागतात. सगळया बाळगोपाळांना लहान मुर्ती असली तर प्रॉब्लेम येत नाही. परंतु, जर मुर्ती मोठी असली तर त्यांची भावना अशी असते की ते स्वतःची मुर्ती पाण्यात जाईपर्यंत बघतात, समुद्रात बुडेपर्यंत बघतात. आपल्या त्याच्यासाठी दोन बत्त्या, दोन जे.सी.बी. असतात.

**जयंत पाटील :-**

आम्हाला सगळे मान्य आहे.

**रोहिदास पाटील :-**

फोरकीमधून विसर्जन ठेवा. फोरकीमधून उचलायला कोणी नसते.

**दिपक खांबित :-**

आपण मागच्या मिटींगमध्ये याबाबत बोललो होतो.

(सन्मा. सदस्य ॲड. श्री. एस. ए. खान ह्यांनी ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

श्री. खांबित, माझी या ठिकाणी अशी एक सुचना आहे की आपण गणपतीची मुर्ती ट्रकमध्ये उचलून ठेवतो. आपण त्याला चॅनेल सिस्टिम केली तर ती होडीपर्यंत जाईल. जशी धक्क्याला बोट लागते. त्याच्यानंतर ती बोट समांतर राहते. त्याप्रमणे चॅनेल सिस्टिम केल्यानंतर तिथून मुर्ती उचलली तर ती सुरक्षित राहिल. कधी-कधी मुर्ती कलंडते.

**रोहिदास पाटील :-**

दुसरी सुचना अशी आहे की एक छोटी मुर्ती असते. तेथील लोक तसे बोलत नाहीत किंवा होम गार्ड तुमच्यावर अवलंबून नसतात. होम गार्डची डयुटी असते म्हणून ते येतात. आपण त्यांना मान देतो, आपण त्यांना विनंती करतो म्हणून ते येतात. परंतु, आपण त्यांना नास्ता वगैरे देत नाही. गेल्या वर्षी सचिवसाहेबांनी कुठून व्यवस्था केली माहिती नाही. आपल्या महापालिकेच्यावतीने पॅकेट दिले. गणपती विसर्जनाच्या दिवशी शेवटी जेवण असते. जेवढे जेवता येईल तेवढे जेवायचे असते. परंतु, एक असा मॅसेज जातो की आपल्याला महापालिकेकडून काहीही मिळालेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुम्ही शेवटच्या दिवशी अल्पोपहाराची तरतुद करा.

**रोहिदास पाटील :-**

आज आपण छोटे पॅकेट देतो की मोठे पॅकेट देतो ते महत्वाचे नाही. तुम्ही जे दयाल ते पोटभर दया. परंतु, ते महापालिकेने दिले असे व्हायला पाहिजे. पंरतु, महापालिका काहीही देत नाही.

**रतन पाटील :-**

आज तिथे विसर्जनासाठी दुपारी ३.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत सगळे असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हया लोकांना अल्पोपहाराची व्यवस्था करावी अशी माझी एक सुचना ॲड करा.

**मा. सभापती :-**

हयाच्यामध्ये अशी एक सुचना आहे की नगरपालिकेने अशी व्यवस्था केल्यानंतर आपण जो ठराव करतो किंवा दुसरी गोष्ट म्हणजे आपण परवा पोलिसांची सभा बोलावलेली होती. खरे म्हणजे नगरपालिकेचे लोक येणार होते. परंतु, जे मेन लोक आहेत. ते लोक तिथे ऐकायला यायला पाहिजे होते. परंतु, कोणी आले नाही.

**रतन पाटील :-**

कदाचित त्यांना बोलावले नसेल. खरे म्हणजे महापालिकेच्या लोकांना बोलावले पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

गणपतीपूर्वी सर्व तयारी म्हणून पोलिसांनी एक मिटींग लावलेली होती. त्या ठिकाणी आपले कुठलेही अधिकारी हजर नव्हते. खरे म्हणजे लोक काय बोलतात? ते आपल्याला ऐकायला पाहिजे होते.

**दिपक खांबित :-**

परंतु, त्या दिवशी ती मिटींग झालेली नव्हती.

**मा. सभापती :-**

परवाच्या दिवशी मिटींग झालेली होती. त्या मिटींगमध्ये खूप लोकांनी आरोप केलेले होते. मी शेवटी उत्तर दिले की सगळे रस्ते दुरूस्त करायचे आणि मी नंतर काय ते बघतो असे मी लोकांना सांगितलेले होत.

**रोहिदास पाटील :-**

त्या दिवशी मिटींग झाली. त्यावेळेला पुष्कळ लोक होते. परंतु, त्याच्यामध्ये आपल्या महानगरपालिकेची माणसे नव्हती. आम्हीच आमची बाजू मांडली.

**दिपक खांबित :-**

आम्हाला त्या मिटींगसाठी बोलावलेले नव्हते.

**मा. सभापती :-**

तुम्हाला त्या मिटींगसाठी बोलावलेले होते.

**दिपक खांबित :-**

साहेब, अशी कुठलीही मिटींग आपल्याशिवाय होत नाही.

**जयंत पाटील :-**

मग ती मिटींग अधिकृत नव्हती का?

**मा. सभापती :-**

मी त्या मिटींगमधे लोकांना तुम्ही घाबरू नका. आम्ही खड्डे रिपेरिंग करुन देउ असे आश्वासन दिले. परंतु, मेन म्हणजे पाउस थांबला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

जर तुमच्याशिवाय मिटींग होत नसेल तर त्या दिवशी जी मिटींग झाली ती अधिकृत नव्हती असे आम्ही समजायचे का?

**दिपक खांबित :-**

बहुतेक सर्व मिटींगमध्ये ९९ टक्के आपल्या महापालिकेशी संबंधित प्रश्न विचारले जातात.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला त्या मिटींगला बोलावले नव्हते असे तुमचे म्हणणे आहे का?

**मा. सभापती :-**

त्या मिटींगसाठी मा. आयुक्तसाहेबांना बोलावलेले होते. मी पोलिसांना मिटींग संबंधी प्रश्न विचारला तेव्हा मा. आयुक्तसाहेबांना बोलावलेले होते असे त्यांनी सांगितले.

**रतन पाटील :-**

साहेब, माझी या ठिकाणी अशी सुचना आहे की आपले कर्मचारी गणपती विर्सजनाच्या दुस-या दिवशीपासून म्हणजे दिड दिवसाच्या गणपती विसर्जनापासून ते अनंत चर्तुथीपर्यंत काम करतात. परंतु, त्यांना ज्या-ज्यावेळी पोलिस बंदोबस्त येतो. त्यावेळेला हाकलले जाते आणि तिथे महापालिकेने ठरविल्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी दिवस-रात्र काम करतात किंवा महापालिकेचे जे कोणी प्रतिनिधी असतील ते तिथे काम करतात. त्यामुळे तुम्ही अशा लोकांना गंज्या दयाव्यात असे मला वाटते. कारण हे सर्व महापालिकेचे प्रतिनिधी आहेत. ही सर्व लोक महापालिकेचे गणपती विसर्जनाचे काम करतात. पोलिस त्यांना सुरक्षेच्यादृष्टीने बाहेर करतात. त्यांच्याकडे काहीही साहित्य नसते. त्यांच्याकडे बॅच नसतो, हे नसते, ते नसते. त्यामुळे तुम्ही अशा कर्मचा-यांना महापालिकेच्यावतीने गंज्या दया. मागच्या वेळेला सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी भाईंदर (वेस्ट) ला गंज्या दिलेल्या होत्या. हा विषय स्थायी समितीमध्ये झालेला होता. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे गंज्या देतात मग आपण का देत नाही? आज या ठिकाणी सन्मा. सदस्य मोहन पाटील उपस्थित नाहीत. म्हणून सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी विषय घेतलेला होता. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी स्वतःच्या पैशाने गंज्या दिलेल्या होत्या. मग महापालिका गंज्या का देत नाहीत? सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी त्याच्यावर आक्षेप घेतलेला होता. म्हणून महापालिकेने गंज्या दयाव्यात.

**मा. सभापती :-**

श्री. खांबित, तुम्ही 'मिरा भाईंदर महापालिके'च्या नावाने गंज्या दया.

**फॅरो ग्रिटा :-**

साहेब, तुम्ही 'मिरा भाईंदर महानगरपालिके' च्या नावाने गंज्या दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

महापालिकेच्या आयडेन्टिफिकेशनचे जे कव्हर दिले जाते ते दिले जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेब, कुठल्याही संस्थेने किंवा नगरसेवकांनी दिलेल्या गंज्या घालू नयेत अशी आपल्या पालिकेच्या कर्मचा-यांना स्ट्रिक्ट वॉर्निंग दया.

**रतन पाटील :-**

इतर कुठल्याही गंज्या घालता कामा नये.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

महापालिकेच्या गंज्या दिल्यानंतर प्रश्न येत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती लोक तरीसुध्दा गंज्या घालतील.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला गंज्या दिलेल्या होत्या. तेव्हा त्याच्यावर आक्षेप घेतलेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठेकेदाराचे कर्मचारी असतील तर त्यांना तशी वॉर्निंग दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

महापालिकेने गंज्या दिल्यानंतर प्रश्न येत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तरीसुध्दा लोक गंज्या घालतील.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी गंज्या दिलेल्या होत्या. तेव्हा त्याच्यावर आक्षेप घेतलेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता एखादा कर्मचारी आहे. मी त्याला गंजी दिली आणि घालायला सांगितले तर तो कर्मचारी घाबरतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही समजून घेत नाही. तो माणूस उघडा होता. तुमच्यासारख्या नगरसेवकाने किंवा महापालिकेने गंज्या दिल्या आणि त्यांनी त्या घातल्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तरीसुध्दा त्या गंज्या घालणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

महापालिकेने गंज्या दिल्यानंतर इतर कोणीही गंज्या घालणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तरी लोक गंज्या घालतील. कुठल्याही संस्थेने किंवा नगरसेवकाने दिलेल्या गंज्या घालू नयेत अशी तुम्ही आपल्या कर्मचा-यांना स्ट्रिक्ट वॉर्निंग दया.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

बाहेरच्या संस्थेने दिलेल्या गंज्या घालणार नाही.

**जेन्वी आल्मेडा :-**

बाहेरच्या संस्थासुध्दा गंज्या देतात.

**रतन पाटील :-**

साहेब, महत्वाची सुचना म्हणजे विसर्जनाच्या वेळेला जी माईकची सिस्टिम असते. त्याबाबत महापालिकेने माईकवर बोलण्यासाठी आपली माणसे ठेवावीत. कोणीही जाते, काहीही बोलते, काहीही करते असे चालणार नाही.

**फॅरो ग्रिटा :-**

कोणीही उठून माईक हातात घेतो.

**रतन पाटील :-**

महापालिकेने महापालिकेच्या संदर्भात बोलायचे. हयाची नोंद करण्यात यावी.

**ग्रिटा फॅरो :-**

परंतु, महापालिकेने नेमलेला माणूस आजारी आहे.

**रतन पाटील :-**

ज्याला कोणाला बोलायचे असेल महापालिकेने त्याची ठरवून नियुक्ती करावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्टेजवर आपले कर्मचारी, नगरसेवक या व्यतिरिक्त दुसरे कोणीही नको आहेत. त्यामुळे स्टेजवर नगरसेवकांची लाईन लागत नाही. दुसरे कोणीही येते आणि स्टेजवर उभे राहते.

**जयंत पाटील :-**

जर महापालिकेतर्फे तशी व्यक्ती नसेल तर बाहेरुन पैसे देउन बोलवा. परंतु, त्या व्यक्तीचे वकृत्व चांगले पाहिजे. त्यानी महापालिके संबंधी चांगली माहिती सांगितली पाहिजे. आपण गणपती विसर्जनासाठी ज्या-ज्या योजना राबवित आहोत. त्याचा त्यांनी उल्लेख केला पाहिजे. नाहीतर कोणीतरी येते आणि वक्तव्य करते असे होता कामा नये.

**रोहिदास पाटील :-**

आपण बाहेरून निवेदक किंवा निवेदिकांना बोलवू शकतो.

**दिपक खांबित :-**

आपण निवेदिकांनासुध्दा घेउ शकतो.

**रोहिदास पाटील :-**

आपण निवेदकांना बोलवुया.

**शशिकांत भोईर :-**

आपण दोन निवेदक मागवायचे आहेत.

**नगरसचिव :-**

आपण ईस्ट आणि वेस्टसाठी दोन निवेदक मागवायचे आहेत.

**मा. सभापती :-**

आपण चार निवेदक मागवायचे आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण शेवटच्या दिवशी निवेदक मागवुया.

**दिपक खांबित :-**

आपण शेवटच्या दिवशी निवेदक मागितले तर चालतील.

**जयंत पाटील :-**

आपल्याला चार निवेदक लागतील.

**रोहिदास पाटील :-**

मग तसा ठराव घ्या. फोरकी, लाईट, होमगार्डसाठी नास्तापाणी, फायरब्रिगेड, व्ही.आय.पी. पार्किंग असे सर्व काही ठरावात मेन्शन करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आज या ठिकाणी ज्या सुचना आलेल्या आहेत. त्याचा उल्लेख करुन ठराव अंतिम करण्यात यावा व त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जावी.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. ८० :-**

भाईंदर (पुर्व) चौपाटी, धक्क्याकडे जाणारे रस्ते विसर्जन व्यवस्थाकरिता तयार करणे कामांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) काशिमिरा, मिरा रोड, दहिसर भागातील श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन भाईंदर (पुर्व) धक्क्यावर करण्यात येते. सदर धक्क्यावर जाण्याकरीता जेसलपार्क हा मार्ग असुन परती करीता एस. व्ही. रोड, नवघर रोड हा मार्ग निश्चित करण्यात येतो. भाईंदर (पुर्व) रेल्वे समांतर रस्त्यावरील रेल्वे विभागाचे कुंपणभिंतीचे काम पुर्ण झालेले असुन सदर रस्ता नव्याने तयार केल्यास नागरिकांना धक्क्यावर येण सुलभ होउन जेसलपार्क मधील रस्त्यावरील गर्दी कमी होईल. तसेच धक्क्यावर रस्ता रुंद केल्यास विसर्जन ठिकाणी होणारी गैरसोय दुर होईल. सदर कामी खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | भाईंदर (पुर्व) धक्क्यापर्यतचा रस्ता रुंद करणे. | रु. ५,२६,१००/- |
| २) | भाईंदर (पुर्व) रेल्वे समांतर रस्ता तयार करणे. | रु. १७,४४,७००/- |
| ३) | भाईंदर (पुर्व) ओस्वाल ओनिक्स ते रो हाउुस पाठीमागील रस्ता तयार करणे. | रु. २६,५२,१५०/- |
| ४) | भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) चौपाटीवर व्हीडीयो शुटींग/ केबल ऑन लाईन प्रक्षेपण करणे समुद्रात मोठाले लाईटिंग व्यवस्था करण, फोर क्लीफ्ट व्यवस्था, फस्ट एड, शिडी व्यवस्था, नाश्ता इ. व्यवस्था करणे. | रु. ३,००,०००/- |

वरील कामे ही श्री गणेश विसर्जनापुर्वी पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर कामी ''भाईंदर पुर्व, पश्चिम चौपाटी विस्तार'' या लेखाशिर्षातुन व ''डी. पी. रोड'' मधुन पुर्नविनियोजनाद्वारे ''रस्ते नविन'' या लेखाशिर्षखाली तरतुद उपलब्ध करण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यास विनंती आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८१ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

माझी या ठिकाणी अशी एक महत्वाची सुचना आहे की, आपण संबंधित ठेकेदाराच्याजोडीला करारनामा केलेला होता. त्याच्यासाठी काय अटीशर्ती घातलेल्या आहेत? याचा प्रशासनाने खुलासा करावा. आम्हाला काय-काय अटीशर्ती घातलेल्या आहेत? ते माहिती नाही.

**एस. ए. खान :-**

परिवहन विभागाला देण्याची काहीही गरज नाही. आपण ऑलरेडी करारनाम्यामध्ये अटीशर्ती काय अटीशर्ती नमुद केलेल्या आहेत?

**शशिकांत भोईर :-**

आपण करारनामा कोणत्या पध्दतीने केलेला आहे? ते सांगा. त्याच्या अटीशर्ती काय आहेत? याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

त्यांनी सामान कुठे ठेवायचे? वगैरे अटीशर्तीमध्ये नमुद केलेले आहे. ते सर्व काही घ्यायचे आहे.

**जयंत पाटील :-**

